सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित



## मुंबईचे आव्हान संपुष्टात ?

**चेन्नई :** हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्ससाठी आयपीएल २०२६ चा हंगाम जवळपास संपला आहे. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात मुंबईचे फलंदाज पुन्हा एकदा अपयशी ठरले आणि त्यांना केवळ १५९ धावा करता आल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाड (६७*) आणि कार्तिक शर्मा (५४*) यांच्या खेळीच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्सने ८ गडी राखून एक मोठा विजय मिळवला. हा पराभव मुंबईचा त्यांच्या नवव्या सामन्यातील सातवा पराभव ठरला. जरी त्यांनी त्यांचे उर्वरित पाच सामने जिंकले, तरी ते जास्तीत जास्त १४ गुणच मिळवू शकतील, ज्यामुळे प्लेऑफमधील स्थान मिळवणे शक्य होईल.

## कार विक्रीत वाढ

**मुंबई :** एप्रिल २०२६ महिना संपताना भारतातील कार उत्पादक कंपन्यांनी आर्थिक वर्ष २०२७ ची सुरुवात अत्यंत सकारात्मक नोंदींसह केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत बहुतांश कंपन्यांनी विक्रीत लक्षणीय वाढ नोंदवली असून देशांतर्गत बाजारात स्पर्धा अधिक तीव्र झाल्याचे चित्र दिसून आले आहे. विशेषतः मारुती सुझुकीने आपले वर्चस्व अधिक मजबूत केले असून टाटा मोटर्स आणि महिंद्रा अँड महिंद्रा यांनी अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान कायम ठेवले आहे.

## थॉमसकपमध्ये भारताचा पराभव

**कोपनहेगन :** डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे झालेल्या थॉमस कप २०२६ च्या उपांत्य फेरीत भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाला फ्रान्सकडून पराभव स्वीकारावा लागला. लक्ष्य सेनची अनुपस्थिती संघाला महागात पडली. पराभव पत्करूनही, भारतीय संघाने कांस्य पदक जिंकले आणि २०२२ मधील सुवर्णपदकानंतर थॉमस कपच्या इतिहासातील आपले दुसरे पदक निश्चित केले. पॅरिस २०२४ मध्ये उपांत्य फेरी गाठणारा आणि जागतिक बॅडमिंटन क्रमवारीत ११ व्या स्थानावर असलेला, भारताचा अव्वल क्रमांकाचा पुरुष एकेरी बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन या सामन्यात सहभागी नव्हता. शुक्रवारी चायनीज तैपेईविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात लक्ष्यला कोपराला दुखापत झाली होती.

## कारवाई करा : आ. कोटेचा

**मुंबई:** धावत्या कारवर लाकडी फळी कोसळल्याच्या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर मुलुंडचे भाजप आमदार मिहिर कोटेचा यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला पत्र लिहून तात्काळ चौकशी करण्याची तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासोबतच पॅरापेट भिंत कोसळल्याच्या आधीच्या घटनेच्या चौकशी अहवालाची प्रत सार्वजनिक करण्याचीही त्यांनी मागणी केली आहे.

## आजपासून लष्करी सराव

**नवी दिल्ली :** भारत-कंबोडिया द्विपक्षीय लष्करी सरावाची दुसरी आवृत्ती 'सिनबॅक्स-खख २०२६' साठी भारतीय लष्कराची एक तुकडी रवाना झाली आहे.

हा सराव ४ ते १७ मे २०२६ या कालावधीत कंबोडियातील, कंम्पोंग स्पेयू प्रांतातील, टेको सेन फ्नोम थॉम म्रीस प्रॉव रॉयल कंबोडियन हवाई दल प्रशिक्षण केंद्रात आयोजित केला जाईल.मित्र राष्ट्रांसोबत सुरू असलेल्या भारताच्या संरक्षण सहकार्यांतर्गत, जागतिक सुरक्षा आव्हानांच्या बदलत्या पार्श्र्वभूमीवर कंबोडिया सोबतचा हा सिनबॅक्स-खख सराव अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

# दिल्लीत एसीच्या स्फोटात ९ जणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था**



**नवी दिल्ली :** दिल्लीतील विवेक विहार परिसरातील चार मजली इमारतीत पहाटे एसीचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या दुर्घटनेत ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत. ही आग दुसऱ्या मजल्यावरील एसीमध्ये झालेल्या स्फोटामुळे लागल्याची प्राथमिक माहिती आहे. पहाटे ३:३० वाजण्याच्या सुमारास लागलेली आग काही क्षणांतच इमारतीच्या वरच्या मजल्यांपर्यंत पसरली.

आग इतकी भीषण होती की अनेकांना स्वतःचा जीव वाचवण्याची संधीही मिळाली नाही. काहींचे मृतदेह बेडवरच आढळले, तर काही जणांचे मृतदेह जिन्यावर जळालेल्या अवस्थेत सापडले. तिसऱ्या मजल्यावर राहणारे काही लोक जीव वाचवण्यासाठी छताकडे पळाले, मात्र छताचा दरवाजा बंद होता. दरवाजा बंद असल्यामुळे बरेच जण अडकले आणि जिन्यावरच त्यांचा मृत्यू झाला.इमारतीच्या पुढील बाजूस राहणाऱ्या काही रहिवाशांना वाचवण्यात यश आले, मात्र मागच्या बाजूस असलेल्यांना बाहेर काढणे कठीण ठरले. मृतदेह इतके जळाले आहेत की त्यांची ओळख पटणे अवघड झाले आहे. अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे, तीन मृतदेह बेडवर आढळले असून यावरून आगीची तीव्रता लक्षात येते.

स्थानिक नगरसेवक पंकज लुथरा घटनास्थळी पोहोचल्यानंतर त्यांनी सांगितले की, दुसऱ्या मजल्याच्या मागील बाजूस पाच मृतदेह सापडले, तर एक मृतदेह मागील भागात आणि तीन वरच्या मजल्यावर आढळले. मृतांची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचणी करण्यात येणार आहे.अग्निशमन अधिकारी मुकेश वर्मा यांच्या माहितीनुसार, इमारतीच्या मागील बाजूस आग लागली होती, इमारतीतून नऊ जळालेले मृतदेह बाहेर काढण्यात आले. इमारतीत फक्त एकच जिना होता आणि बाल्कनीला जाळ्या लावल्या असल्यामुळे बचावकार्य करताना अडचणी आल्या. घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्ट सर्किटची शक्यता वर्तवली जात आहे.

# आठव्या वेतन आयोगात मिळणार पगारवाढीचा 'बूस्टर'

**तभा वृत्तसेवा**



**मुंबई :** आठव्या वेतन आयोगाच्या आणि कर्मचारी संघटनांच्या औपचारिक वाटाघाटी या आठवड्यात संपन्न झाल्या असून, संघटनांनी ३.८३ फिटमेंट फॅक्टरसह ६९,०००रुपये किमान वेतनाची मागणी केली आहे. ही मागणी मान्य झाल्यास, कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनात २८३% वाढ होईल. सध्या,सातव्या वेतन आयोगाअंतर्गतकर्मचाऱ्यांना दरमहा किमान १८,००० रुपये मूळ वेतन मिळते, जे सहाव्या वेतन आयोगाअंतर्गत मिळणाऱ्या ७,००० रुपयांपेक्षा जास्त आहे.
२८ ते ३० एप्रिल दरम्यान नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत, राष्ट्रीय परिषदेने सुमारे ३६ लाख केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वेतनवाढ, वेतन रचनेत बदल आणि वाढीव निवृत्तीवेतन व भत्त्यांची मागणी केली.एनसी-जेसीएम कर्मचारी पक्षाने ३.८३ फिटमेंट फॅक्टर ची मागणी केली आहे, जो ७ व्या वेतन आयोगाअंतर्गत असलेल्या २.५७ फिटमेंट फॅक्टरपेक्षा १२६ बेसिस पॉइंट्सने जास्त आहे. जर ३.८३ फिटमेंट फॅक्टर स्वीकारला गेला, तर पगारात २८३% वाढ होईल. याचा अर्थ असा की, एखाद्या व्यक्तीचा सध्याचा १८,००० रुपयांचा मूळ पगार अंदाजे ६९,००० रुपयांपर्यंत वाढेल, तर सर्व वेतन बँडमध्ये मध्यम-स्तरीय पगारातही लक्षणीय वाढ होऊ शकते.फिटमेंट फॅक्टर म्हणजे काय? फिटमेंट फॅक्टर हा एक गुणक आहे, जो सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी नवीन मूळ पगार किंवा निवृत्तीवेतन निश्र्चित करण्यासाठी वापरला जातो. फिटमेंट फॅक्टरनुसार, जर तुमचा सध्याचा मूळ पगार १८,००० असेल आणि प्रस्तावित फिटमेंट फॅक्टर ३.८३ असेल, तर नवीन मूळ पगार = १८,००० ÷ ३.८३ = ६८,९४० फिटमेंट फॅक्टर जितका जास्त असेल, तितकी कर्मचाऱ्याच्या पगारात जास्त वाढ होईल, ज्याचा परिणाम त्यांच्या पेन्शनवरही होईल. कर्मचारी संघटनांनी ६९,००० किमान मूळ पगार निश्र्चित करण्याचा प्रस्ताव दिला आहे. पूर्वी, सातव्या वेतन आयोगाअंतर्गत, किमान वेतनाची गणना तीन जणांच्या कुटुंबाच्या आधारावर केली जात होती. आता, संघटनांचे म्हणणे आहे की कुटुंबात वृद्ध पालकांचाही समावेश केला पाहिजे, ज्यामुळे कुटुंबाचा आकार पाच घटकांपर्यंत वाढेल. पगाराची ही नवीन मागणी पाच लोकांच्या खर्चाच्या आधारावर करण्यात आली आहे.

# मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक'वर सेल्फी अन् फोटो काढण्यास मज्ज्ञाव

**तभा वृत्तसेवा**



**मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंकच्या ( मिसिंग लिंक ) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहनचालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असु आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे.

१ मे महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात 'मिसिंग लिंक'चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले. महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्र्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे २४७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे. सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (चडठऊ) सहा हजार ७०० कोटी खर्च करून विकसित केलेल्या या प्रकल्पात दोन बोगदे, दोन पूल आणि टायगर व्हॅलीवरील एका केबल-स्टेड पुलाचा समावेश आहे.

यामुळे तीव्र उतार असलेल्या आणि अपघातप्रवण खंडाळा किंवा भोर घाट भागाला वळसा घालून एक नवीन मार्ग उपलब्ध झाला आहे, जिथे विशेषतः शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये अनेकदा वाहतूक कोंडी होते.'हा प्रकल्प १९.१६ किलोमीटर लांबीच्या आधुनिक कॉरिडॉरचा एक भाग आहे', असे एम.एस.आर.डी.सी.ने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'या 'मिसिंग लिंक'मुळे मुंबई-पुणे प्रवासाचे अंतर सुमारे सहा किलोमीटरने कमी होईल आणि प्रवासाचा वेळ २० ते ३० मिनिटांनी कमी होईल'.

## पीडित मुलीचा शवविच्छेदन अहवाल पोलिसांकडे

**तभा वृत्तसेवा**

**पुणे :** अवघ्या साडेतीन वर्षांच्या एका चिमुकलीवर ६५ वर्षांच्या सराईताने अत्याचार करून दगडाने ठेचून खून केल्याची अत्यंत घृणास्पद घटना नसरापूर येथे शुक्रवारी उशिराने उघडकीस आली. या घटनेनंतर नसरापूर परिसरात संतापाची लाट उसळली असून, पोलिसांनी अवघ्या दोन तासांत आरोपीला अटक केली आहे. आरोपीला ताब्यात द्या; अन्यथा एन्काउंटर करा, हीच मागणी नसरापूर परिसरातून केली जात आहे. या प्रकरणात राजगड पोलिसांनी तत्काळ कार्यवाही करून आरोपी भीमराव कांबळे (वय ६५, रा. भोर) याला अटक केली असून, आरोपी बिगारी कामगार आहे. त्याला शिवाजीनगर येथील पुणे न्यायालयाने सात मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या नराधमाने या चिमुकलीचा मृतदेह गुरांच्या गोठ्यात पालापाचोळ्याखाली लपवला होता.

## राज्य मंडळाचा नवा निर्णय; मार्कशीट आणि प्रमाणपत्र आता एकत्रित

**तभा वृत्तसेवा**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शनिवारी दुपारी १२ वाजताच ऑनलाइन निकाल जाहीर केला. यंदा विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुरक्षाकवच असलेले प्रमाणपत्र दिले जाणार आहे. येत्या १५ दिवसांत विद्यार्थ्यांच्या हातात प्रमाणपत्र पडणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली आहे.

कुलकर्णी म्हणाले की, बारावी परीक्षेसाठी प्रचलित पद्धतीने गुणपत्रक व प्रमाणपत्र स्वतंत्र न देता या परीक्षेपासून गुणपत्रक व प्रमाणपत्र एकत्रित छपाई करून देण्यात येणार आहे. तसेच, प्रचलित पद्धतीमध्ये गुणपत्रक व प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचे नाव छपाई करताना प्रथम आडनाव, विद्यार्थ्यांचे नाव व वडिलांचे नाव, याप्रमाणे छपाई करण्यात येत होती. यंदाच्या परीक्षेपासून प्रथम विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव याप्रमाणे छपाई करण्यात येणार आहे. प्रमाणपत्राच्या बॉर्डरमध्ये बाराखडी, गणितातील काही गोष्टी यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचा फोटो असणार आहे. क्यूआर कोड तसेच होलोग्राम देखील छापण्यात येणार आहे. आधीच्या गुणपत्रिकांमध्ये १०० हून अधिक चुका होत्या. त्या सर्व चुका दुरुस्त करण्यात आल्या आहेत.

राज्य मंडळाच्या या अत्याधुनिक प्रमाणपत्राची कॉपी करणे किंवा दुबार प्रमाणपत्र बनवून फसवणूक करणे, यापुढे शक्य होणार नाही. यापूर्वी निकालानंतर मार्कशीट दहा दिवसांत मिळायची तर सर्टिफिकेट ६ महिन्यांनी मिळायचे. आता मात्र पहिल्यांदाच मार्कशीट आणि सर्टिफिकेट एकाच दिवशी मिळेल; म्हणजे निकाल लागल्यापासून १५ दिवसांच्या आत विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांमार्फत प्रमाणपत्राचे वाटप केले जाईल, असे देखील कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

# कपिल शर्माच्या कॅनडातील 'कॅप्स कॅफे'जवळ पुन्हा गोळीबार

**तभा वृत्तसेवा**






**मुंबई :** एकदा पुन्हा कॉमेडियन कपिल शर्मा यांच्या कॅनडातील रेस्टॉरंट 'कॅप्स कॅफे' जवळ गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. हा गोळीबार त्यांच्या कॅफेच्या शेजारी असलेल्या रेस्टॉरंटवर करण्यात आला. बिश्र्नोई गँगच्या एका कथित सदस्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून कपिल शर्मा यांना धमकीही दिली आहे.या गोळीबाराच्या घटनेनंतर एक सोशल मीडिया पोस्ट समोर आली आहे.
ही पोस्ट टायसन बिश्र्नोई उर्फ जोरा सिद्धू नावाच्या व्यक्तीने शेअर केल्याचे सांगितले जाते. तो बिश्र्नोई गँगचा कथित सदस्य असल्याचे म्हटले जाते. या पोस्टमध्ये तो लिहितो, 'चाय सुट्टा बार कॅफेवर गोळीबार झाला आहे. हे कॅप्स कॅफेच्या शेजारी आहे. आमचा याला आणि कपिल शर्मा यांना संदेश आहे की लाईनवर या.' पुढे पोस्टमध्ये कपिल शर्मा यांना इशारा देत म्हटले आहे, 'चाय सुट्टा बारच्या जागी पुढच्या वेळी तुझे कॅप्स कॅफे आणि मुंबईतील घर असेल. यावेळी आम्ही कोणाच्या शिफारशीवर थांबणार नाही.'कपिल शर्मा यांच्या कॅफेवर यापूर्वीही तीन वेळा गोळीबार झाला आहे. पहिल्या गोळीबाराची जबाबदारी लॉरेन्स बिश्र्नोई गँगने स्वीकारली होती. हे गँग बॉलिवूडमधील व्यक्तींना धमक्या देण्यासाठी ओळखले जाते. तिसऱ्या वेळीही या गँगच्या सदस्यांनीच कपिल शर्मा यांच्या कॅफेवर गोळीबार केल्याचे सांगितले गेले होते. पहिली घटना गेल्या वर्षी जुलैमध्ये, दुसरी ऑगस्टमध्ये आणि तिसरी दिवाळीपूर्वी घडली होती.सध्या कपिल शर्मा यांच्या कॉमेडी शोचा चौथा सीझन प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. याशिवाय काही काळापूर्वी त्यांचा 'किस किसको प्यार करूं २' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. मात्र या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

## मुख्यमंत्री २४ तास राजकारणात मग्न

# राज्यात कायद्याचा बोजवारा : संजय राऊत

**तभा वृत्तसेवा**



**मुंबई :** महिला व मुलींवर अत्याचार होण्याची घटना पहिली नाही. मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस आल्यापासून राज्यात महिलांवरील अत्याचार, हत्या आणि कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडला आहे. गृहमंत्री म्हणून त्यांनी जी कर्तव्ये पार पाडायला पाहिजेत, ती पार पाडली जात नाहीत. आमचे मुख्यमंत्री टिवल्या-बावल्या करत इकडे-तिकडे किंवा कधी पश्र्चिम बंगालमध्ये प्रचाराला, कधी केरळमध्ये, कधी आसाममध्ये तर कधी तामिळनाडूमध्ये प्रचाराला जातात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे २४ तास केवळ राजकारणात आणि इतर राज्यांच्या प्रचारात अडकलेले आहेत, अशा शब्दांत शिवसेना (उबाठा ) खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर तोफ डागली.
नुकत्याच घडलेल्या भोर येथील घटनेचा संदर्भ देत राऊत म्हणाले की, मिसिंग लिंक रस्त्याच्या उद्घाटनावेळी ट्रॅफिक जाम झाल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी जनतेची माफी मागितली. जर ट्रॅफिकसाठी माफी मागता येते, तर चिमुरडीवर झालेल्या अत्याचार आणि हत्येबद्दल त्यांनी माफी का मागितली नाही? या अपयशाबद्दल मुख्यमंत्र्यांनी तात्काळ जनतेची माफी मागायला हवी.हे राज्य आता सामान्य माणसाला राहण्यालायक उरलेले नाही. केवळ पैशाचा माज आणि सत्तेच्या मस्तीवर हे सरकार चालले आहे. चार वर्षांच्या मुलीवर नराधम अत्याचार करतात, कारण त्यांना कायद्याची भीती नाही. अशा परिस्थितीत आता राज्यातील माता-भगिनींनी आणि विरोधी पक्षांनी या सरकारविरोधात रस्त्यावर उतरून बंड पुकारले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले'.
तुम्ही ग्रामस्थांवर, जनतेवर लाठीचार्ज केला, पण तुमच्या कायद्याचा धाक राहिलेला नाही. तुमचा कायद्याचा धाक तुम्ही सामान्य जनतेला दाखवताय. ज्यांच्यावर तुम्ही लाठीमार केला त्या जनतेचा काय दोष आहे? ते त्या मुलीचा मृतदेह घेऊन रस्त्यावर उतरले कारण सरकार नालायक आहे. आंदोलन केले त्यांच्या भावना अत्यंत संतप्त आहेत. ग्रामस्थांनी सुद्धा असे म्हटले की, त्या आरोपीला आमच्या हवाली करा किंवा त्याला तात्काळ फाशी द्या. खरं तर या सरकारलाच जनतेने ताब्यात घेतले पाहिजे. या प्रकरणात खरं तर सरकार आणि पोलीस हेच 'आरोपी' आहेत. पोलीस दलाचा वापर केवळ राजकीय सुरक्षेसाठी केला जात असून, या नालायक सरकारवरच खटला भरला पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

# भारतीयांसाठी आनंदाची बातमी! ५६ देशांमध्ये व्हिसा-फ्री प्रवास शक्य




**नवी दिल्ली :** तुमचा पासपोर्ट ठरवतो की, तुम्ही जगभरातील कोण कोणत्या देशांमध्ये व्हिसा शिवाय फिरू शकता. नुकत्याच समोर आलेल्या हेनली पासपोर्ट इंडेक्स-२०२६ च्या रिपोर्टनुसार, भारतीय पासपोर्टने मोठी झेप घेतली आहे. रँकिंगमध्ये भारत १० अंकांनी पुढे गेला असून, जगभरात ७५ व्या स्थानावर पोहोचला आहे. मात्र, अमेरिका आणि ब्रिटनसारख्या श्रीमंत देशांच्या पासपोर्टचे रँकिंग घसरल्याचे पाहायला मिळत आहे.गेल्या वर्षी भारत ८५ व्या स्थानावर होता, आता ७५ व्या स्थानावर आला आहे. भारताच्या या प्रगतीमागे विविध देशांसोबत झालेले नवे द्विपक्षीय करार कारणीभूत असल्याचे मानले जाते आहे. सध्या भारतीय नागरिक ५६ देशांमध्येव्हिसा-फ्री किंवा व्हिसा ऑन अरायव्हलसुविधेसह प्रवास करू शकतात. जगभरात, भारताची स्थिती मध्यम असून, ही भारतीयांसाठी आनंदाची बातमी आहे.पासपोर्ट इंडेक्स ही एक अशी रँकिंग सिस्टिम आहे, जी एखाद्या देशाचा पासपोर्ट वापरून तुम्ही जगातील किती देशांमध्ये विना व्हिसा सुविधेद्वारे प्रवेश करू शकता. ही रँकिंग देशाची आर्थिक स्थिरता, देशांमधील संबंध, राजकीय स्थिरता, सुरक्षा नियम यावर ठरते. ज्यादेशाचा पासपोर्टइंडेक्समध्ये वरच्या क्रमांकावर असतो, त्या देशाच्या नागरिकांना परदेश प्रवासासाठी व्हिसा मिळवण्यासाठी महिनाभर वाट पहावी लागत नाही. व्हिसा अर्जाचा खर्च वाढतो. तसेच जगाच्या विविध भागात सुलभपणे प्रवास करण्याची संधी मिळते.जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्ट म्हणून सिंगापूरने त्याचे स्थान राखले आहे. सिंगापूरचे नागरिक १९२ देशांमध्ये विना व्हिसा फिरू शकतात.
जपान, दक्षिण कोरिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांनी दुसऱ्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे. त्यांचे नागरिक १८७ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात.एकेकाळी पहिल्या क्रमांकावर असलेला अमेरिका आता १० व्या स्थानावर आहे. अमेरिकेच्या कडक व्हिसा धोरणांमुळे आणि इतर देशांशी असलेल्या करारांमधील तफावतीमुळे हे घडले आहे. त्यामुळे अमेरिकेची स्थिती फारशी चांगली नाही.पाकिस्तानची स्थिती बिकट पाकिस्तानच्या रँकिंगमध्ये किरकोळ सुधारणा झाली असली तरी, त्यांची स्थिती अजूनही चिंताजनक आहे. ते ९८ व्या स्थानावर असून त्याचे नागरिक केवळ ३१ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात. ग्लोबल स्टेटसमध्ये पाकिस्तानची स्थिती येमेन, इराम आणि अफगाणिस्तान यांसारख्या देशांच्या श्रेणीत आहे.

## भटक्या विमुक्तांना प्रमाणपत्र वाटप करणे संबंधि जिल्हाधिकारी समवेत बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि ३ मे |** विनय गौडा जी. सी.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर समवेत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना दि ३० एप्रिल रोजी विविध प्रमाणपत्रे वाटप करणे, संदर्भात जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रत्येक भटके -विमुक्तांच्या वस्तीमध्ये शिबिर लावणे, संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे नियोजन करणे या विषयांवर चर्चा झाली. भटक्या विमुक्तांच्या विकास वाटा हे पुस्तक . जिल्हाधिकारी यांना भेट देण्यात आले. सदर बैठकीस मित्रू पी .एस.( भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि .प. डॉ. कमलाकर मुदखेडकर जिल्हा शल्य चिकित्सक, लखिचंद.ह.चव्हाण ,उपायुक्त मनपा ,डॉ.सारिका लांडगे, साथ रोग अधिकारी ,(डीएचओ) प्रेषित मोघे (एल डी एम ),जिल्हा अशासकीय सदस्य सर्वश्री सर्जेराव वाघ, एड. संतोष केंद्रे ,गणेश काळे, दत्तात्रय दंडवलकर ,विजय पवार, विभाग संयोजक, देवगिरी प्रांत धर्मास्था प्रमुख, वंदनाताई कसारे महिला प्रमुख ,इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे दत्तात्रय वाघ, संतोष वाघ इत्यादींची उपस्थिती होती.

# वीज, पाणी, स्वच्छतेसाठी पैठणकर हैराण

तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०३ |** पैठण नगर परिषदेवर सत्ता स्थापन होऊन ५ महिने उलटले तरी ही पैठणकर वीज,पाणी आणि स्वच्छतेच्या प्रश्नाने ग्रासले असून नागरिक लोकप्रतिनिधींना याबाबत जाब विचारत आहेत. नेमके कारण नसतांना ही वारंवार विद्युत पुरवठा तसेच पाणी पुरवठा खंडित होणे, जागोजागी कचऱ्याचे ढीग जमा झाल्याने पैठणकर हैराण झाले आहेत.

उन्हाच्या उकाड्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना घाम फुटला असून ऐन दुपारच्या वेळेत महावितरण मेंटेनन्सच्या नावाखाली वीज घालवत आहे. मेंटेनन्स महत्वाचे असल्यास त्यासाठी आठवड्यातुन दोन दिवस निवडा त्याचा योग्य टाईमिंग निश्चित करा आणि मगच काम करा अशी मागणी नागरिकांनी केली आहे. विद्युत पुरवठ्याशी निगडित असलेल्या



शहरातील पाणी पुरवठ्यावर याचा गंभीर परिणाम होत असून नगर परिषद पाणी पुरवठा विभागात एकसूत्री पणा नसल्याने पाण्यावाचून नागरिकांचे हाल होत आहे. अनेक भागात पाणी पुरवठ्यात अनियमितता,कमी दाबाने पाणी, दूषित पाणी पुरवठा होत आहे. उन्हाळ्यात पाण्यावाचून नागरिकांचा जीव कासावीस होत असतांना त्यात नगर परिषद भर टाकत आहे. यातच पैठणकरांना स्वच्छतेच्या प्रश्नाने ही ग्रासले असून पैठण न्यायालय न्याय देवतेच्या परिसरात मोठया प्रमाणात कचरा साचला आहे.तीर्थक्षेत्र पर्यटन नगरीत जागोजागी कचऱ्याचे ढीग आणि नाल्या जाम झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. ज्याने नागरिकांना आजार उद्भवून 'गरिबीत आटा गिला' म्हणण्याची वेळ आली आहे. नगर परिषद प्रशासन आमचे ऐकत नसल्याचा सूर थेट नगर परिषद सभागृहातून येत आहे. नुकतीच पार पडलेल्या बैठकीत अनेक नगरसेविका आणि नगरसेवकांनी न. प. विरोधात आंदोलन छेडण्याचा ईशारा दिला आहे. एकंदरीत वरील प्रश्नावर नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसणकर, मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

## पालकमंत्री शिरसाठ यांच्याहस्ते अश्विनी लखमले यांना सम्मानचिन्ह



तभा वृत्तसेवा

**पैठण दि २ |** १ मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित शासकीय कार्यक्रमात "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार" सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात पालकमंत्री तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते पैठणच्या प्रा. सौ. अश्विनी दीपक लखमले यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले,

## देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयात युवाव्हर्स २०२६ उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर: देवगिरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट स्टडीज, छत्रपती संभाजीनगर येथे इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभाग व आय.ई.टी.ई. विद्यार्थी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा झालेला "युवाव्हर्स २०२६" हा महोत्सव म्हणजे केवळ एक कार्यक्रम नव्हता—तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना, उर्जेला आणि कल्पनाशक्तीला पंख देणारा एक प्रेरणादायी प्रवास होता. दि. २९ एप्रिल ते २ मे दरम्यान रंगलेल्या या महोत्सवात प्रत्येक दिवस नव्या उमेदीने, नव्या कल्पनांनी आणि नव्या अनुभवांनी उजळून निघाला. कॅम्पसच्या प्रत्येक कोपऱ्यात उत्साहाची लहर जाणवत होती—कुठे कल्पनांचा वर्षाव, कुठे स्पर्धेची थरारक धडधड, तर कुठे मैत्री, टीमवर्क आणि आनंदाचा सुंदर संगम! या महोत्सवाचा समारोप सोहळा देखील तितकाच भव्य आणि भावपूर्ण ठरला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने यांच्या प्रेरणादायी उपस्थितीत कार्यक्रमाला एक वेगळीच उंची मिळाली. त्यांच्या सोबत विभागप्रमुख डॉ. आरती वाडेकर, आय.ई.टी.ई. समन्वयक श्री. आनंद देशमुख, विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि उत्साही विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. "युवाव्हर्स २०२६" ची खरी ताकद म्हणजे — विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी उभा केलेला हा महोत्सव! आय.ई.टी.ई. विद्यार्थी मंचाच्या कोअर समिती सदस्यांनी नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक जबाबदारी अत्यंत कौशल्याने पार पाडली. स्टेजवर आत्मविश्वासाने उभे राहून त्यांनी केवळ कार्यक्रम सादर केला नाही, तर आपल्या नेतृत्वगुणांचा आणि संघभावनेचा ठसा उमटवला. महोत्सवातील उपक्रमांनी तर रंगतच वाढवली. "माइंडबाझ" या स्पर्धेत हशा, अंदाज आणि थरार यांचा अप्रतिम मिलाफ अनुभवायला मिळाला, तर "आयडिया स्टॉर्म" ने नवोपक्रमांच्या ठिणग्या पेटवत विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचारांना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त फारोळा ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३ मे पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे ग्रामपंचायत अधिकारी .ए.एस. तुपे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपस्थित मुख्याध्यापिका.स्वाती थिगळे, फारोळा तलाठी आर. जी. मोखेडे. मीनाक्षी धुमाळ, अनिता पठारे, मीरा हाडे,रेखा इंदापुरे,गायत्री तुपे, मीना पवार,कोमल निकम, कांजन मराठे,शालीनी थोरात,अपर्णा निकुंभ,शितल केजकर, अरविंद महाकाळे, वर्षाराणी कमळू,सुलभा शेळके, शितल शिरवत,प्रणाली भिलेगावकर, मिनाक्षी शिताळ, ज्योती जवणे,वर्षा नवगिरे, ज्योती खेडकर,सांडु धुमाळ,संदिप चाव्हरे, शिवाजी गोरे,योगेश महानुभाव, विष्णू धरपळे,इलियास पठाण, श्रीधर धरपळे, दिलीप गोरे, गणेश गायकवाड,तेजस जाधव, संजय धुमाळ, रविंद्र पवार,मंगेश धुमाळ लिंबाजी गोरे,अदि गावकरी उपस्थित होते

## लेखणीद्वारे महामानवांना अभिवादन; 1245 विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग"

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०३ मे - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कन्नड तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव यांच्या संकल्पनेतून तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समितीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा बुद्ध पौर्णिमेनिमित्त बुद्ध विहार, हिवरखेडा रोड (कन्नड) येथे पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. कन्नड




तालुक्यातील विविध शाळांमधील पाचवी ते दहावीच्या 1245 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत लेखणीच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम वैष्णवी गणेश बनकर, द्वितीय वैष्णवी प्रकाश निकम, तृतीय स्पृहा सुहास जवळकर, चतुर्थ तेजल रमेश चव्हाण, पाचवा क्रमांक प्रतीक्षा योगेश जाधव. तसेच आरुषी नवनाथ तुपे, शितल भीमराव जाधव, अर्शिम सलीम शेख, अर्पिता परमेश्वर आडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

विजेत्या विद्यार्थ्यांना 15 हजार रुपयांच्या पुस्तकांचे तसेच प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. लातूर जिल्ह्याचे मुद्रांक अधिकारी गोरख सातदिवे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राजानंद सुरडकर, नगरसेवक युवराज बनकर, अनिल शिरसाठ, राजू शेख, डॉ. प्रतिभा अहिरे, राजू आवचार, सचिन भामरे आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण दाभाडे यांनी केले.

## शिक्षणातून समाज घडवणाऱ्या शिक्षकाचा गौरव"

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०३ मे - शिवनगर येथील संत ज्ञानेश्वर विद्या मंदिरमधील सहशिक्षक अरविंद भीमराव पदमे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

पदमे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले असून,



समाजातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला.

प्रतिक्रिया व्यक्त करताना पदमे म्हणाले, "हा सन्मान पुढील कार्यासाठी प्रेरणादायी असून, अधिक जोमाने आणि निष्ठेने काम करण्याची ऊर्जा देणारा आहे." त्यांनी सहकारी शिक्षक, संस्था व कुटुंबियांचे आभार मानले.

या सन्मानामुळे विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षक म्हणून समाजात सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साबुसिंग राठोड, उपाध्यक्ष रामदास सुरडकर, सचिव पांडुरंग राठोड, सहसचिव संजय पुरी, कोषाध्यक्षा सरला सोनवणे, संचालक शिवाजी वाघ, संचालक मुकुंद शिंदे, मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## 1999या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



सिल्लोड प्रतिनिधी

येथील जवाहर विद्यालयाच्या १९९९ या शैक्षणिक वर्षातील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २७ वर्षांनंतर एकत्र येत गेट-टुगेदर चा कार्यक्रम अत्यंत उत्साहात साजरा केला. अनेक वर्षांनंतर जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट झाल्याने शाळेच्या प्रांगणात आनंदाला उधाण आले होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी त्या काळातील शिक्षक राजेंद्र तंगडे सर प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन कृतज्ञतापूर्वक सत्कार केला.आठवणींचा खजिना उलगडलाशाळेच्या त्याच वर्गांत आणि बाकांवर बसून विद्यार्थ्यांनी बालपणातील खोडकरपणा, अभ्यासाच्या गप्पा आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला. विविध शहरांत स्थायिक झालेले विद्यार्थी या निमित्ताने एकत्र आले होते. प्रत्येकाने आपला परिचय देत सध्याच्या जीवनातील अनुभव मांडले.

काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शालेय जीवनातील शिक्षकांचे मार्गदर्शनच आमच्या यशाचा पाया असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन विलास शेळके यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन जय जैस्वाल यांनी केले होते. यावेळी विजय जैस्वाल,विजय पहारे,फिरोज पठाण,खलील शेख इसरार शेख,गणेश बावणे, छाया लोखंडे, साधना चव्हाण, मनीषा भाले यासह इतर माझी विद्यार्थी उपस्थित होते.

## 'राजा शिवाजी'_ या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीत रचला इतिहास!

### पहिल्या दिवशी ₹१२.४० चा बॉक्स ऑफिस गल्ला

छत्रपती संभाजीनगर - जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनीच्या रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' या चित्रपटाने धमाकेदार पदार्पण केले असून, पहिल्याच दिवशी तब्बल ₹१२.४० कोटींची निव्वळ कमाई करत *कोणत्याही मराठी चित्रपटासाठी आतापर्यंतचा सर्वात मोठा ओपनिंग डे* नोंदवला आहे. जिओ स्टुडिओजद्वारे १ मे २०२६ रोजी मराठी आणि हिंदीमध्ये मोठ्या थाटामाटात प्रदर्शित झालेल्या, या महान योद्ध्या राजाला वाहिलेल्या चित्रपट-साहित्याने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे.

## आळंदी येथे "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"चा दिमाखदार शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर - आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात दिनांक १ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात "विश्वमंगल मराठी फाउंडेशन" चा भव्य शुभारंभ सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध भागांतून तसेच देश-विदेशातून अनेक उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शुभारंभ सोहळ्यास माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख (सोलापूर), प्रख्यात वक्ते व ज्येष्ठ निरुपणकार श्री. विवेकजी घळसासी, तसेच राज्यभरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून जागतिक स्तरावरील नामांकित उद्योजक श्री. संजय वायाळ (ईशवेद बायोटेक प्रा. लि.), डॉ. उदय भोसले (वैज्ञानिक, लंडन) आणि श्री. आप्पासाहेब कोंढारे (सुवर्ण व्यावसायिक, दुबई) हे विशेषतः परदेशातून उपस्थित राहिले होते.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने 32,086 युनिट्स विक्री नोंदवली

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज एप्रिल 2026 महिन्यातील आपली विक्री कामगिरी जाहीर केली असून, एकूण 32,086 युनिट्स विक्री नोंदवली आहे. ही विक्री एप्रिल 2025 मधील 27,329 युनिट्सच्या तुलनेत 17% वाढ दर्शवते. यामध्ये देशांतर्गत बाजारातील 30,159 युनिट्स विक्री आणि 1,927 युनिट्स निर्यात यांचा समावेश आहे.एप्रिल 2025 आणि एप्रिल 2026 यांची वर्षानुवर्षे तुलना केल्यास, एकूण विक्री 27,329 युनिट्सवरून 32,086 युनिट्सपर्यंत वाढून 17% वाढ नोंदली गेली आहे. देशांतर्गत विक्री 24,833 युनिट्सवरून 30,159 युनिट्सपर्यंत वाढली असून यात 21% वाढ झाली आहे. मात्र, निर्यात 2,496 युनिट्सवरून 1,927 युनिट्सपर्यंत घटली असून यात 23% घट दिसून आली आहे.

## जेव्हा इक़बाल सेटवर येतो

सोनी सब ची मालिका यादें आपल्या आकर्षक कथानक आणि प्रेक्षकांना भिडणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे सतत लोकप्रिय ठरत आहे. प्रेक्षकांना इक़बाल खान आणि गुलकी जोशी यांची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री आवडतेच, पण सेटवरील वातावरणही तितकेच उत्साही असते, आणि त्याचे कारण म्हणजे इक़बाल खानची करिष्माई उपस्थिती.

## पुष्पाच्या विश्वासाला हादरा

सोनी सब ची पुष्पा इम्पॉसिबल मालिका भावनिक आणि रोमहर्षक ड्रामामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवते. पुष्पा (करुणा पांडे) आपल्या चाळीतल्या कुटुंबासोबत विश्वास आणि शंकेच्या द्वंद्वात अडकलेली दिसते. शनाया (मुस्कान बामणे) सोबत नातं जुळवण्याचा प्रयत्न करत असताना काही अनपेक्षित घटना तिच्या मनात शंकेची बीजे पेरतात.

## एमजीएममध्ये 'कलायडोस्कोप 2026' फॅशन शो उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या लिओनार्दो दा विंची स्कूल ऑफ डिझाईनच्या (एलएसओडी) वतीने आयोजित करण्यात आलेला 'कलायडोस्कोप २०२६' फॅशन शो विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

विद्यापीठातील रुक्मिणी सभागृहात 'कलायडोस्कोप २०२६ फॅशन शो'चे उद्घाटन फेमिना मिस इंडिया स्पर्धेतील प्रथम उपविजेत्या राजनंदिनी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. उद्घाटन सोहळ्यास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षक निलेश घम, परीक्षक श्रीमती अन्विता अग्रवाल, संचालिका



प्रा.शुभा महाजन, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

या वार्षिक फॅशन शो मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. यामध्ये अंतिम वर्ष बी.डिझाईन (फॅशन डिझाईन) च्या २० विद्यार्थ्यांसह ॲडव्हान्स डिप्लोमा आणि सर्टिफिकेट अभ्यासक्रमातील १२ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विद्यार्थ्यांनी एकूण ८४ वैविध्यपूर्ण आणि आकर्षक गारमेंटसचे सादरीकरण यावेळी केले. 'मुंबई आर्किटेक्चर', 'स्ट्रेंजर थिंग्स', 'राजस्थानचा राजद्वार', 'लिपन आर्ट', 'चँडेलियर', 'स्टिच्ड मेमरीज' आणि 'कॉटेज गार्डन' यांसारख्या विविध थीम्सवर आधारित कलेक्शन या शोमध्ये सादर करण्यात आले.

या फॅशन शो आयोजनामध्ये अंजली खोत, सुजीत गुळवे, शिवानी खेडकर, सृष्टी अंबुलगेकर प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधितांनी योगदान दिले. या फॅशन शो'चे सुत्रसंचालन अदिती शर्मा आणि आमना यांनी केले.

राजनंदिनी पवार, प्रथम उपविजेत्या, फेमिना मिस इंडिया स्पर्धा : "आपल्या प्रत्येकाच्या मनात एक स्वप्न असते आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कुटुंब, विशेषतः पालकांची साथ अत्यंत महत्त्वाची असते. योग्य सपोर्ट सिस्टिम मिळाल्यास कोणतीही उंची गाठणे शक्य होते. एमजीएम विद्यापीठासारख्या अत्याधुनिक सुविधा असलेल्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी प्रत्येक संधीचा लाभ घेत विविध कार्यक्रम व स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

## सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा बारावीचा निकालात उल्लेखनीय यश

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ मे

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,सोयगाव येथील फेब्रुवारी 2026 मध्ये जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक (HSC) परीक्षेच्या निकालात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध शाखांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवून महाविद्यालयाची परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखा :

विज्ञान शाखेत संस्कृती त्रिंबक काळे व आकाश सुनील जंजाळ यांनी प्रत्येकी 80.50% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सोहम विनोद बारोटे व निशांत ज्ञानबा भगत यांनी 80.33%



गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर प्रथमेश श्रीकांत बोर्से (79.17%) याने तृतीय क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखा :

वाणिज्य शाखेत रोहिणी माणिकलाल राजपूत हिने 71.50% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. श्रावण गोपाळ चव्हाण (66.33%) याने द्वितीय, तर स्वरूप विवेक महाजन (63.33%) याने तृतीय क्रमांक मिळवला.

कला शाखा :

कला शाखेत जान्हवी हेमंत अस्वार हिने 69.17% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. श्रीराम सुरेश बागुल (65.33%) द्वितीय, तर टीना सतीश तुळसकर (63.00%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

एमसीव्हीसी (व्यावसायिक) शाखा :

एमसीव्हीसी शाखेत प्रियंका रविंद्र अधव हिने 78.83% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. हर्षदा रामदास जाधव (75.83%) द्वितीय, तर आरती बालचंद जाधव (71.67%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ नाना काळे, सचिव प्रकाश दादा काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार , उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या या यशामागे पालक व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### नारीला माणूस म्हणून स्वीकारा - डॉ. प्रयदर्शनी
### ज्ञानोपासक महाविद्यालयात 'नारीवाद और नारी विमर्श' विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

**परभणी,/प्रतिनिधी :** नारी ही कधीच दुर्बल नव्हती, मात्र पुरुषप्रधान मानसिकतेमुळे तिला दुय्यम स्थान देण्यात आले आणि तिच्यावर अन्याय करण्यात आला. नारीला माणूस म्हणून स्वीकारा, असे आवाहन इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठ, हैदराबाद येथील डॉ. प्रियदर्शनी यांनी केले.

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात हिंदी विभागामार्फत एक दिवसीय 'नारीवाद और नारी विमर्श' राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात यशस्वीपणे संपन्न झाले. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख मोहम्मद बाबर उपस्थित होते, तर उद्घाटकीय बीज भाषण इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठ, हैदराबाद येथील डॉ. प्रियदर्शनी यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, नारी ही कधीच दुर्बल नव्हती, मात्र पुरुषप्रधान मानसिकतेमुळे तिला दुय्यम स्थान देण्यात आले आणि तिच्यावर अन्याय करण्यात आला. इतिहास व पौराणिक ग्रंथांमध्येही तिच्यावर झालेल्या शोषणाचे अनेक संदर्भ आढळतात, असे त्यांनी सांगितले.

हिंदी विभाग प्रमुख डॉ. सुजितसिंह परिहार यांनी या परिसंवादाचे प्रास्ताविक केले तर डॉ. उर्मिला पोरवाल डॉ. राजश्री मोरे, डॉ. अरुणा शुक्ला, डॉ. सविता कीर्ते आणि डॉ. पल्लवी पाटील यांनी विविध क्षेत्रात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी यांनी विविध समित्यात काम करून सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निर्मला जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दिपाली अवचार यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने देशभरातून विविध संशोधक प्राध्यापक उपस्थित होते. या चर्चासत्रास हिंदी विभागातील डॉ.संतोष सोळंके, प्रा. आनंद लोखंडे, प्रा.चोरघडे सुर्यकांत, डॉ. दिपाली अवचार आदींनी परिश्रम घेतले.

### सासरवाडीत मिळालेल्या अवमानास्पद वागणुकीमुळे जावयाची आत्महत्या : दैठणा पोलिस ठाण्यात चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** सासरवाडी मिळालेल्या अवमानास्पद वागणूकीमुळे जावयाने आत्महत्या केल्याची घटना दैठणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. दरम्यान, या प्रकरणात चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसमत तालुक्यातील हट्टा येथील संदीप डुकरे (वय २५ वर्ष) हे स्वतःच्या पत्नी व मुलीस सावरवाडीहून परत आणण्याकरीता परभणी तालुक्यातील सिंगणापूर या गावी म्हणजे सासरवाडीस दाखल झाले. त्यावेळी सासरच्या मंडळींनी मुलीस परत पाठविण्यास नकार तर दिलाच व धमक्याही दिल्या. त्याच ताण तणावातून डुकरे यांनी शुक्रवारी पहाटे सिंगणापूर येथील रेल्वे गेट परिसरात रेल्वे समोर उडी मारुन आत्महत्या केल्याची माहिती डुकरे कुटूंबियांनी दैठणा पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीद्वारे दिली. त्या आधारे पोलिसांनी चौघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस या प्रकरणात तपास करीत आहेत.

### अतिक्रमित रेल्वे जमिनीच्या पुनर्प्राप्तीतील दिरंगाईबद्दल डॉ. फौजिया या खान यांनी चिंता व्यक्त केली, उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेची मागणी केली

**परभणी,/प्रतिनिधी-** अधिकृत आकडेवारीनुसार एकूण रेल्वे जमिनीपैकी केवळ ०.२२ टक्के जमीन अतिक्रमणाखाली असूनही, डॉ. फौजिया खान यांनी आज संसदेत अतिक्रमित रेल्वे जमिनीच्या पुनर्प्राप्तीच्या दिरंगाईबद्दल एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. धोरणात्मक दावे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिणाम यांच्यातील गंभीर तफावतीवर प्रकाश टाकत, डॉ. खान यांनी निदर्शनास आणून दिले की, गेल्या पाच वर्षांत केवळ ३३.६७ हेक्टर जमीन परत मिळवण्यात आली आहे. त्यांनी यावर जोर दिला की, ही दिरंगाई विशेषतः उच्च घनतेच्या शहरी भागांमध्ये चिंताजनक आहे, जिथे अतिक्रमणांमुळे प्रवासी सुरक्षा पायाभूत सुविधांमध्ये थेट अडथळा येतो आणि महत्त्वाच्या स्थानक पुनर्विकास प्रकल्पांना विलंब होतो. डॉ. खान यांनी रेल्वे मंत्रालयाला, अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमधील अतिक्रमित जमिनीच्या पुनर्प्राप्तीला प्राधान्य देण्यासाठी स्पष्ट आणि लक्ष्य-केंद्रित प्रशासकीय यंत्रणेच्या अभावाबद्दल प्रश्न उपस्थित केला. त्यांनी यावर जोर दिला की, धोरणात्मक प्राधान्याशिवाय, हा मुद्दा आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांमध्ये एक कायमस्वरूपी अडथळा बनण्याचा धोका आहे.

### दिव्यांग बांधवांद्वारे आमदार डॉ. राहुल पाटील यांचा सत्कार
### दिव्यांग बांधवांनी व्यवसायासाठी जागेची मागणी करावी : आ. डॉ. राहुल पाटील

**परभणी,/प्रतिनिधी :** दिव्यांग बांधव ज्या भागात राहतात तेथील प्रशासकीय यंत्रणेकडे त्यांनी व्यवसायासाठी जागेची मागणी करावी, असे आवाहन आ. डॉ. राहुल पाटील यांनी केले. दिव्यांगांच्या प्रश्नावर नुकताच आ. डॉ. पाटील यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. याबद्दल दिव्यांग बांधवांच्या वतीने आ. डॉ. पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

२००६-२००७मध्ये तत्कालीन सरकारने दिव्यांग बांधवांना व्यवसायासाठी जागा देण्याचे आदेश काढले होते. या आदेशानुसार दिव्यांगांना ते राहत असलेल्या ठिकाणी दर्शनी भागात २०० फुटाची जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतू गेल्या १९ वर्षात मराठवाड्यातील कोणत्याही दिव्यांगांना व्यवसायासाठी जागा मिळाली नसल्याचे आ.डॉ.पाटील यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करत शासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. यावर मंत्री अतुल सावे यांनी मुंबईसह अन्य शहरात अशा प्रकारच्या जागा उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. परभणी जिल्ह्यात दिव्यांगांना जागा मिळाली नसल्यास त्याची चौकशी करून मागेल त्या दिव्यांगांना जागा देण्यात येईल असे आश्वासन दिले. या पार्श्वभुमीवर आ. पाटील म्हणाले की, दिव्यांग बांधवांनी व्यवसायासाठी दर्शनी भागात २०० स्क्वेअर फूट जागा पाहिजे असल्यास महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती यांच्याकडे अर्ज करावेत.

यावेळी दिव्यांग बांधवांनी आ. पाटील यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. आ. पाटील दिव्यांगांचे प्रश्न सातत्याने शासन दरबारी लावून धरत आहेत. आ. पाटील यांच्या पाठींब्यामुळे दिव्यांग बांधव सक्षम होत असल्याचे मत यावेळी दिव्यांग बांधवांनी व्यक्त केले. यावेळी रामराव डोंगरे, नवनीत पाचपोर, बंडू बीडकर, प्रकाश जाधव, विष्णू वैरागड, विलास राठोड, महेंद्र फुटाणे, गंगाधर गाडगे यांच्यासह दिव्यांग बांधव संजय वाघमारे, राहुल शिवभगत, शैलेश नवघडे, माऊली भरोसे, ज्ञानबा कदम, पाईकराव, गणेश शिंदे, ज्ञानोबा ढाले, अनिल पामे, सुरेश पाचपुंजे, गजानन दुधारे, ज्ञानदेव ढाले, एस. के. अहमद, गजानन गारूडे, नारायण धुमाळ, मदन निर्वळ, शेख फजल, खलील खान, सदाशिव पांचाळ, भगवान जल्हारे, दिलीप सौदागर, रमेश खंडागळे, सोनबा पाईकराव, सुमीत गोरे व शेकडो दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# परभणी जिल्ह्याच्या विकासाला गती;विविध योजनांतून जिल्हयाचा सर्वांगीण बदल-- पालकमंत्री

**परभणी ,/प्रतिनिधी:-** जल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून आरोग्य, शिक्षण, शेती, पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्रात ठोस बदल घडवले जात आहेत. सौर ऊर्जा उपक्रम, शेतपाणंद योजना आणि डिजिटल सेवा यांसारख्या उपक्रमांमुळे जिल्हयाच्या विकासाला नवी गती मिळत आहे, असे प्रतिपादन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त येथील प्रियदर्शिनी इंदिरा गांधी स्टेडीयमवर आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण हे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते पार पाडले. त्यावेळी शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. या प्रसंगी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता वाकळे, महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आदींसह स्वातंत्र्य सैनिक, पदाधिकारी, पत्रकार, नागरिक, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सर्व उपस्थितांना पालकमंत्री यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी आपल्या संदेशात महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देत महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान समाजसुधारकांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे त्यांनी आवाहन केले.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, देशातील डिजिटल जनगणना प्रक्रियेस सुरुवात झाली असून १ ते १५ मे दरम्यान स्व-गणना सुरू आहे. या प्रक्रियेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन नागरिकांनी जनगणना पोर्टलवर



अचूक माहिती भरावी. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर काळजी घेण्याचे तसेच जूनमध्ये होणाऱ्या वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. बालविवाहासारख्या कुप्रथांविरुद्ध जागरूक राहून १०९८ या क्रमांकावर माहिती देण्याचेही सांगण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी विविध योजना, सौर कृषी पंप, आणि शेतरस्ते विकास उपक्रम राबविण्यात येत असून शेती अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे, असे सांगून पालकमंत्री म्हणाल्या की, आरोग्य क्षेत्रात जिल्ह्याने उल्लेखनीय प्रगती केली असून विविध अभियानांद्वारे नागरिकांचे आरोग्य सक्षम करण्याचे काम सुरू आहे. ''माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव'' आणि एचपीव्ही लसीकरण मोहिमेत नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असेही आवाहन करण्यात आले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य व महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारासाठी आयुष्यमान कार्ड काढण्याचे आवाहन करण्यात आले. घरकुल, सौर ऊर्जा आणि सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन जीवनमान उंचावण्याचेही पालकमंत्री यांनी सांगितले. महसूल विभागाच्या उपक्रमांमधून हजारो लाभार्थ्यांना थेट लाभ मिळाला असून डिजिटल गाव नकाशे, व्हॉट्सएप चॅटबॉट आणि आपत्ती व्यवस्थापन प्रणालीमुळे प्रशासन अधिक गतिमान झाले आहे. जिल्ह्याचा आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात समावेश झाल्याने आरोग्य, शिक्षण, शेती, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकासाला चालना मिळणार आहे. औद्योगिक विकासासाठी परभणीला ''उदयोन्मुख जिल्हा'' दर्जा मिळाल्याने गुंतवणूक व रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे. कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलिस यंत्रणेला आधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कामगार दिनानिमित्त कष्टकरी वर्गाच्या योगदानाचे कौतुक करुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले. शेवटी थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्रसाठी पालकमंत्री यांनी उपस्थित सर्वांना थॅलेसेमिया मुक्तीची शपथ दिली. प्रारंभी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी पोलिस, गृहरक्षक दल तसेच अन्य जवानांच्या पथ संचलनाचे निरिक्षण करुन संचलनाची मानवंदना स्वीकारली. यावेळी पालकमंत्री यांनी स्वातंत्र्यसैनिक आणि उपस्थित नागरिकांची भेट घेऊन त्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तत्पुर्वी पालकमंत्री यांच्या हस्ते राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त खेळाडुंना सन्मानपत्र देण्यात आले. तसेच उत्कृष्ट कार्य करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी पालकमंत्री यांच्या हस्ते बालविवाह प्रतिबंध लघुपट व पोस्टरचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक प्रविण वायकोस यांनी केले.

### आजपासून ४ मे पर्यंत परभणी जिल्हयात मेघगर्जनेसह वादळी पाऊस बरसणार

**परभणी,/प्रतिनिधी-** आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ०४ मे रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो.

३० एप्रिलच्या तुलनेत ०४ मे रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो.

त्यानंतर १ ते ४ मे दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घेण्याची गरज आहे.

## परभणीत बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश

**परभणी,/प्रतिनिधी:** चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे महिला व बाल विकास विभागाने तातडीने कारवाई करत परभणी शहरात होणारा बालविवाह रोखण्यात यश मिळवले.

सकाळी सुमारे १०:३० वाजता मिळालेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील एका अल्पवयीन बालिकेचा विवाह परभणीत होणार होता. माहितीची शहानिशा करण्यासाठी संबंधित बालिकेच्या गावातील ग्रामपंचायतीकडून जन्मनोंद मागविण्यात आली. त्यानुसार बालिकेचे वय १७ वर्षे ६ महिने असल्याचे स्पष्ट झाले, तर विवाहासाठी निवडलेल्या मुलाचे वय २४ वर्ष असल्याचे आढळले.

त्यानंतर नानलपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील मल्हार नगर येथे मुलाच्या राहत्या घरी विवाह होणार असल्याची खात्री पटताच पोलीस निरीक्षक गणेश कदम यांना त्वरित माहिती देण्यात आली. तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी तथा बालविवाह प्रतिबंध अधिकारी मिलिंद वाघमारे यांनाही सूचित करण्यात आले. जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी मोनिका रंधवे यांच्या मार्गदर्शनाखाली चाईल्ड हेल्पलाईनचे जिल्हा समन्वयक संदीप बेंडसुरे, सुपरवायझर सय्यद इशरत, केस वर्कर बाळू गुंडे, अंगणवाडी सेविका श्रीमती एस. के. वाळवंटे तसेच नानलपेठ पोलीस स्टेशनचे पीएसआय श्री. बुधोडकर, एएसआय श्री. एच. एस. मरगळ आणि बीट जमादार बी. के. लिंगायत यांनी संयुक्त पथक तयार करून घटनास्थळी धाव घेतली.

पथकाने समुपदेशनाद्वारे संबंधित कुटुंबियांना कायद्याची जाणीव करून दिली आणि बालविवाह थांबवण्यात यश मिळवले. पुढील संरक्षण आणि काळजीच्या दृष्टीने बालिकेला बाल कल्याण समिती, परभणी यांच्यासमोर हजर करण्यात आले.

नागरिकांना आवाहन-बालविवाहासारख्या गुन्ह्यांविषयी माहिती मिळाल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल-फ्री क्रमांकावर कळवावे. बालविवाह रोखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे आजच्या काळात असे बालविवाह होवू नये यासाठी सर्वसामाननी योग्य ती काळजी घेण्याची गरज आहे.

## परभणी तालुक्यातील एकसाल लावणीची ११ मे रोजी हर्राशी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील विविध गावांतील गट क्रमांकांमध्ये सन २०२६-२७ या वर्षासाठी एकसाल लावणीची हर्राशी प्रक्रीया (दि. ११ मे) रोजी सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय परभणी येथे पार पाडली जाणार आहे.

या हर्राशीत पोरजवळा (गट नं. ६८, क्षेत्रफळ ५ हे. ५२ आर.), जलालपूर (गट नं. ६८, क्षेत्रफळ २ हे. ३० आर.), धर्मापुरी (गट नं. १९९, क्षेत्रफळ १२ हे. ०६ आर.), पिंपळा (गट नं. ७९, क्षेत्रफळ ४ हे. ४६ आर.) तसेच पिंपरी देशमुख (गट नं. १८३, क्षेत्रफळ १२ हे. १४ आर.) या गावांतील जमिनींचा समावेश आहे.

हर्राशीच्या प्रक्रियेसाठी काही अटी व नियम निश्चित करण्यात आले असून, सर्वाधिक रक्कमेची बोली लावणाऱ्यास हर्राशी मंजूर करण्यात येईल. हर्राशी मंजूर होताच संपूर्ण रक्कम तत्काळ जमा करणे आवश्यक राहील. तसेच रूपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे. बोली लावण्यापूर्वी सरकारी रकमेच्या ५० टक्के रक्कम आगाऊ भरावी लागणार असून, पूर्वीची थकबाकी असलेल्या व्यक्तींना बोली लावता येणार नाही. हर्राशी अंतिम करण्याचे तसेच बोली स्वीकारणे किंवा नाकारणे याचे अधिकार उपविभागीय अधिकारी, परभणी यांचेकडे राहणार आहेत. अंतिम बोलीनंतर त्याच दिवशी संपूर्ण रक्कम भरल्यानंतरच संबंधित ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या मार्फत एकसाल लावणी जमीन ताब्यात देण्यात येईल. तरी हर्राशीसाठी इच्छुकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसिलदार डॉ. संदिप राजापुरे यांनी केले आहे.

### मातंग समाजातील बांधवांसाठी ५ रोजी रोजी परभणीत कार्यशाळा

**परभणी,-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ अंतर्गत केंद्र व राज्य शासन यांच्या विविध योजना, समाज कल्याण विभाग व जिल्हा परिषद समाज कल्याण विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना मातंग समाजातील बांधवांपर्यंत पोहोचविण्यासाठी मंगळवार, दि. ५ मे २०२६ रोजी परभणी शहरातील कारेगाव रोड येथील जायकवाडी वसाहत परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण

**परभणी,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, तहसीलदार संदिप राजपुरे आणि महसूल प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## सोयीसुविधा युक्त विद्यालयाची उभारणी करणार श्री सोमेश्वरानंद सरस्वती

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:** श्रीक्षेत्र डिघोळ येथे श्रीराम शक्तिपीठ संस्थानाच्या चैतन्य हनुमान मंदिराचे भुमीपुजन सोहळ्यात पीठाधीश्वर श्री सोमेश्वरानंद सरस्वती यांनी डिघोळ परीसरात सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची स्थापना करण्याचा संकल्प बोलुन दाखवला आहे.शुक्रवार रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्र्यंबकेश्वर येथील श्रीराम शक्तिपीठ संस्थान पीठाधीश्वर राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज (पंचायती अखाडा श्री निरंजनी) यांच्या प्रमुख उपस्थितीत व आशिर्वादाने शुक्रवार दिनांक १ मे रोजी डिघोळ येथे चैतन्य हनुमान मंदिर भूमिपूजन व श्रीराम शक्तिपीठ संस्थानाची स्थापना मोठया उत्साहात पार पडली. याप्रसंगी राष्ट्रसंत अनंत विभूषित श्री श्री १००८ महामण्डलेश्वर स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज यांनी मानवतेचा संदेश देवुन भविष्यात श्रीराम शक्तिपीठ संस्थानाकडून शाळा व भावी तरुणपिढी चांगल्या मार्गावर वाटचाल करावी, व्यसनापासून दुर व्हावी, तरूणांनी शिक्षण घ्यावे, जातिवाद,भेदाभेद,भेदभाव करू नका? हा संदेश ग्रामस्थांना दिला.यावेळी त्यांनी डिघोळ परीसरात सर्व सोयीसुविधा युक्त विद्यालयाची स्थापना करण्याचा संकल्प बोलुन दाखवला. या सोहळ्या प्रसंगी भाजपा अध्यात्मिक समन्वय आघाडीचे नाशीक जिल्हाध्यक्ष महन्त सिद्धेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त श्रीनाथानन्द सरस्वतीजी महाराज (श्रीराम शक्तिपीठ संस्थान), महन्त सुदर्शनानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त रामानन्द सरस्वतीजी महाराज, महन्त विश्वेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज,महन्त शिवानन्द सरस्वतीजी महाराज, महन्त हंसानन्द सरस्वतीजी महाराज,डिघोळचे



उपसंरपच अजयकुमार देशमुख, सुधीर बिंदू कृष्णा पिंगळे, त्र्यंबकेश्वर येथील बापू पेंडोळे गुरूजी, प्रविण देशमुख गुरूजी, वैजनाथ शिंदे, मारोतराव रंजवे यांच्यासह नाशिक येथील श्रीराम शक्तिपीठ संस्थानाचे साधक मोठया संख्येने उपस्थित होते.तसेच मोठया संख्येने ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

# ती वेळ आली आहे

## रोखठोक

दिनेश गुणे

गेल्या मार्च महिन्याच्या ८ तारखेस आणि जगभर महिला दिन साजरा केला गेला. सर्वत्र स्त्रीवंदना स्तोत्रे दुमदुमली. महिलांच्या संरक्षणासाठी, सबलीकरणासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही देणारी भाषणे झालीत , समाजमाध्यमांवर महिला सबलीकरणाच्या शपथादेखील घेतल्या गेल्या... वर्षानुवर्षे महिला दिनी हेच घडत आले आहे. त्यामुळे, गेल्या मार्चमध्ये साजऱ्या झालेल्या महिला दिनाचे चित्र यापेक्षा वेगळे असणारच नव्हते. त्यामुळेच, महिलांच्या सबलीकरणाचे आणि सामाजिक सन्मानाचे नवेजुने नारे आठवणे साहजिकच होते. तब्बल १३ वर्षांपूर्वी, २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्रसंघाने एक घोषणा दिली होती. 'बस्स झाले. आता सहन करण्याचे दिवस संपले, महिलांवरील अत्याचारांविरुद्ध ठोस कृतीची वेळ आली आहे!' ... त्यानंतर एक तप उलटून गेले. कृतीची वेळ आली म्हणजे नेमके काय झाले आणि त्या वेळी कोणती कृती केली गेली, असे प्रश्न मात्र अजूनही पिंगा घालतच आहेत. अत्याचार, मानवी तस्करी, बालविवाह, कुपोषण अशा समस्या आजही महिलांच्या सहनशीलतेची कसोटी पाहत आहेत आणि त्या कृतीच्या प्रतिज्ञेला वाकुल्या दाखवत अत्याचारांचा भीषणपणा नवी विक्राळ रूपे घेऊन थयथयाट करत आहे. वारंवार दिल्या जाणाऱ्या त्याच त्याच घोषणांची धारदेखील कमी होऊन त्या बोथट झाल्या आहेत. केवळ कायदे करून आणि कारवाईचा धाक दाखवून अत्याचाराची सामाजिक मानसिकता संपविता येणे शक्य आहे का, असे अनेक प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

महिलांच्या सहनशीलतेला, दुर्बलतेला वेठीस धरणारी ही मानसिकता नेमकी काय आहे?... कशामुळे माणुसकीचादेखील विसर पडतो?... आणि अशा प्रसंगी समाज म्हणून माणसांची काही कर्तव्ये असतील, तर त्याचा विसर पडून नेभळटपणाच का समोर येतो?... स्त्री ही अबला आहे, ही शतकानुशतके रुजविली गेलेली मानसिकता हे पुरुषप्रधान संस्कृतीतील महिला अत्याचारामागील कारण असावे असे सांगितले जाते. मग 'महिलांचे सबलीकरण' नावाच्या सरकारी आणि सामाजिक प्रयोगांचे नेमके फलित काय? महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वयंपूर्ण होण्यासाठी भक्कम आधार देणे असा एक विचार अनेकदा सबलीकरणाच्या समर्थकांकडून मांडला जातो. स्वबळावर उभे राहण्यासाठी आधार देणे ही कल्पनाच विसंगत आहे. सबलीकरणाचे प्रयोग काही मर्यादित अर्थाने कदाचित यशस्वी ठरलेदेखील असतील, पण स्त्री-पुरुष भेदांची दरी पुसून टाकण्यात हा सबलीकरणाचा सरकारी किंवा सामाजिक प्रयोग यशस्वी ठरला आहे का, याचा आढावा घ्यायला हवा. कारण, गेल्या काही महिन्यांत आपल्या आसपास घडलेल्या काही घटनांमुळे समाज अस्वस्थ आहे. महिलांच्या सुरक्षिततेची काळजी अधिक वाढली आहे आणि संरक्षण देण्यात कुठेतरी कमी पडत असल्याची खंतदेखील व्यक्त होत आहे.



गेल्या काही वर्षांत स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण भयावह वाढले. जगभरात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांपैकी एक तृतीयांश, म्हणजे सुमारे ३५ टक्के घटना भारतात होतात, असा एका जुन्याच जागतिक पाहणीचा निष्कर्ष आहे. राष्ट्रीय गुन्हे शोध विभागाच्या एका सर्वेक्षणानुसार, भारतात दर तीन मिनिटाला एका मुलीची छेडछाड होते, तर दर दिवशी सरासरी ८६ महिला बलात्काराच्या शिकार होतात. २०२२ च्या आकडेवारीनुसार, त्या वर्षी महिलांवरील अत्याचाराचे सुमारे साडेचार लाख गुन्हे नोंदविले गेले. म्हणजे, दर तासाला ५१ तक्रारी दाखल झाल्या. हे प्रमाण अगोदरच्या काही वर्षांच्या तुलनेत सुमारे १२ टक्क्यांनी वाढले होते. लैंगिक छळाची तर हजारो प्रकरणे नोंदविली जातात. बलात्कार, अत्याचार, लैंगिक छळाची बातमी नाही, असा एक दिवसही जात नाही. तरीही अनेक बातम्या समाजापर्यंत पोहोचतही नाहीत. त्या तशाच दडपल्या जातात आणि त्या अत्याचाराने उद्ध्वस्त झालेली स्त्री-मुलगी, पुढे आयुष्यभर कुढत, अबला होऊनच दिवस ढकलत राहते. स्त्रीच्या जन्माआधीच तिच्यावरील अत्याचार सुरू होतात, असे म्हटले जाते. स्त्री भ्रूणाची हत्या हा त्याचा ढळढळीत दाखला! काही बुरसट समजुतीतून मुलगी 'नकोशी' होऊ लागली. मुलीचा जन्म नाकारण्याच्या मानसिकतेमागे नवनवी कारणे जन्माला येऊ लागली आहेत. केवळ भित्तिपत्रके, लिखित साहित्य, भिंतीवरल्या घोषणा आणि कोट्यवधी रुपये खर्चून वर्षानुवर्षे केली जाणारी जाहिरातबाजीदेखील ही मानसिकता बदलण्यात फारशी प्रभावी ठरलेली नाही. ही नवी कारणे रोखली नाहीत, तर मुलीचा जन्म हा कुटुंबाचा आनंदसोहळा राहणार नाही...

सुमारे दहा वर्षांपूर्वी, राजस्थानात बालविवाह रोखण्यासाठी सुरू असलेल्या एका सरकारी मोहिमेतील एका कार्यकर्तीला एका स्थानिक कुटुंबात होऊ घातलेल्या एका बालविवाहाची कुणकुण लागली आणि तिने त्याची तक्रार दिली. बालविवाह रोखला गेला, पण या कुटुंबातील पुरुषांनी भर दिवसा, त्या कार्यकर्तीच्या नवऱ्याला शेतात झाडाला बांधून त्याच्यादेखत या कार्यकर्तीवर बलात्कार केला. बलात्काराचे पुरावे नष्ट होण्याआधीच पावले उचलावीत, म्हणून त्या हिंमतवान महिलेने प्रयत्न सुरू केले पण तिला न्याय मिळाला नाही. तिच्यासाठी दोन हजार महिलांनी कलेक्टर कार्यालयासमोर धरणे धरले, तरीही तिची उपेक्षा थांबलीच नाही. विशाखा नावाच्या एका गटाने एक खटला दाखल केला. त्याचा परिणाम म्हणून प्रिव्हेन्शन ऑफ सेक्शुअल हॅरसमेंट अ‍ॅट वर्कप्लेस हा कायदा निर्माण झाला. कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचारास बळी पडणाऱ्या महिलांना कायद्याचे संरक्षण मिळाले.

पण लैंगिक अत्याचाराच्या घटना थांबल्या नाहीतच. अजूनही कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक शोषणाची शिकार होतातच, कारण, सगळ्याच महिलांना अन्यायाविरोधात उठविण्याएवढा आवाज प्राप्त झालेलाच नाही. अलिकडच्या नाशिकमधील एका जागतिक दर्जाच्या कंपनीतील प्रकरणातून हे स्पष्ट झाले. आत्मविश्वासाचा अभाव हे त्याचे कारण असेल, तर हा आत्मविश्वास केवळ भाषणबाजीतून किंवा सरकारी उपाययोजनांतून येणार नाही. ज्या ठिकाणी स्त्री जन्माला येते, लहानाची मोठी होते, तेथे तिला मिळणारी वागणूक तिचे व्यक्तिमत्त्व घडविणारी असली पाहिजे. प्रत्यक्षात मात्र, लहान मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांपैकी अधिक घटनांमध्ये घरच्या, विश्वासातल्या किंवा नातेवाईक असलेल्या पुरुषांचाच सहभाग असतो, हे वारंवार स्पष्ट झाले आहे.

दिल्लीतील निर्भया प्रकरणानंतर बलात्काऱ्यांना कठोर शिक्षा करण्याच्या घोषणा झाल्या, कायद्यालाही धार काढण्याचे उपाय आखले गेले, पीडितांच्या साह्यासाठी निधीची तरतूद केली गेली आणि आता बलात्काराचे धाडसच कुणाला होणार नाही असा डांगोराही पिटला गेला. प्रत्यक्षात मात्र, बलात्कारासारख्या विकृतींचे प्रमाण कमी झालेले नाही. सहज इंटरनेटच्या 'सर्च इंजिन'वर 'बलात्कार' हा शब्द टाईप केला, तर मिनिटागणिक नवी बातमी येऊन आदळताना दिसतेच, पण अमानुषपणाचे असंख्य नमुने हिडीसपणे प्रत्येक बातमीतून समोर येतात. तेव्हाच्या अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी बलात्कार प्रकरणाच्या महाराष्ट्राच्या मनावरील जखमा अजूनही ओल्या आहेत. त्या प्रकरणामुळे उभा देश हादरला, जिल्हा संतापाने धगधगू लागला. सामाजिक असंतोषामुळे कायदा-सुव्यवस्था स्थितीचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत असतानाच, नांदगावला बलात्काराची दुसरी घटना घडली, तर आणखी एका घटनेत, बलात्काराचा प्रयत्न करणाऱ्या नराधमांना व पोलिसांनाच कोंडून ठेवून मारहाण करत ग्रामस्थांनीच कायदा हातात घेतला. एकाच परिसरात एकापाठोपाठ एक घडणाऱ्या अशा घटनांत वासनेची विकृती तर आहेच, पण या घटनांना सामाजिक कारणांचाही कंगोरा असावा, अशी कुजबूज सुरू झाली आणि अशा घटनांचा कायद्यापलीकडच्या अंगाने विचार करण्याची गरज अधोरेखित झाली. त्यालाही आता बराच काळ लोटला आहे.

समाजमाध्यमांवर 'गुडिया' नावाचा एक लघुपट काही वर्षांपूर्वी कमालीचा गाजला होता. रक्त उसळेल, मन थिजून जाईल आणि माणुसकीला शरमेने मान खाली घालावी लागेल अशा विषयावरील हा लघुपट म्हणजे सडलेल्या समाजव्यवस्थेचे व सरकारी यंत्रणांच्या त्रयस्थ मानसिकतेचे विदारक वर्णन आहे. देहविक्रयासाठी वाराणसीसारख्या 'तीर्थक्षेत्री' होणाऱ्या लहान मुलींच्या अपहरण आणि खरेदी-विक्रीच्या अमानवी प्रकारांवर विदारकपणे प्रकाश टाकणाऱ्या या लघुपटातील पात्रे काल्पनिक नाहीत. त्यांच्या स्वानुभवाच्या कहाण्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या आहेत. आपल्या आईचे बोट धरून सकाळच्या वेळी नैसर्गिक विधीसाठी शेतात गेलेल्या एका बालिकेचे ओळखीच्याच तरुणांनी पिस्तुलाचा धाक दाखवून केलेले अपहरण आणि त्यानंतर सुरू झालेली त्या मुलीची परवड, सातत्याने केले जाणारे बलात्कार, शारीरीक वेदना आणि देहाची विटंबना तिच्या तोंडून ऐकताना, ती मुलगी म्हणजे मन मेलेले एक शरीर आहे, हे सतत जाणवत राहते. ही कहाणी एका खेड्यातून सुरू होऊन मुंबईमार्गे वाराणसीपर्यंत पोहोचते... या अमानवी धंद्यात कुटुंबे कशी उद्ध्वस्त होतात, आईबापांनाही गप्प बसणे का भाग पडते, गरिबीमुळे माणसे कशी हतबल होतात, याचे लाज वाटायला लावणारे वास्तव वर्णन या लघुपटातून समोर येते, तेव्हा या समाजात आपणही आहोत, याची चीड आल्यावाचून राहत नाही. वाराणसीत एका दहा वर्षाच्या मुलीचा खुलेआम सुरू असलेला लिलाव, हा या लघुपटातील एक प्रसंग तर, माणुसकीला काळे फासून विक्राळपणे समाजाला चिडवत राहतो... लहान वयातच मुलींना वेश्याव्यवसायात खुलेआम आणण्याचा धंदा चालतो, पळवून वा विकत आणल्यानंतर वेश्याव्यवसायाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केले जातात आणि त्यांची मने मारून टाकण्याचा एक पद्धतशीर प्रयत्न केला जातो. लहान मुलीच नव्हे, तर नवजात बालिकांना थेट इस्पितळांमधून पळवून आणून याच वातावरणात वाढविण्याचा व 'योग्य वेळी' त्यांना धंद्यात ढकलण्याचा संघटित उद्योगही अस्तित्वात असल्याचा दावा या लघुपटात केला गेला आहे. मुलींनी लवकर वयात यावे, यासाठी त्यांना मादक पदार्थ दिले जातात, हॉर्मोनवाढीची इंजेक्शन्स आणि औषधे बळजबरीने पाजली जातात, असेही या लघुपटातील कार्यकर्ती सांगते. प्रतिष्ठित म्हणून वावरणारी माणसे काही प्रश्नांना उत्तरे देताना हात बांधून मान खाली घालून उभी राहिल्याचे एका प्रसंगात दिसते. बहुधा संपूर्ण समाजाचे ते प्रातिनिधिक चित्र असावे...

महिला, मुलींचे बेपत्ता होणे, बळजबरीने लैंगिक अत्याचार करून धर्मांतरास प्रेरित करणे, बलात्कार करून त्याचे चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित करण्याच्या धमक्या देत मुलींच्या असहायतेचा गैरफायदा घेणे आणि फसवणूक करून बळजबरीने विवाह केल्यानंतर मुलीचा खून करून मृतदेहाचे तुकडे फ्रीजमध्ये लपविणे अशा पाशवी मानसिकतेच्या बातम्या कोणतेही सामान्य मन सुन्न करणाऱ्या आहेत. काही वर्षांपूर्वी बिहारच्या सिवान जिल्ह्यात बलात्काराचा प्रतिकार केला म्हणून एका महिलेला रॉकेल ओतून जिवंत जाळण्यात आले, तर हाजीपूरमध्ये दहा वर्षाच्या एका बालिकेवर वरातीसाठी सजविलेल्या मोटारीतच बलात्कार करण्यात आला. उत्तर प्रदेशात बहराईचमध्ये सात वर्षांच्या बालिकेवर तिच्या २४ वर्षांच्या चुलत भावाने बलात्कार केला. पूर्व चंपारण जिल्ह्यात, मैत्रिणीसोबत बागेत खेळणाऱ्या दहा वर्षांच्या बालिकेवर चाकूच्या धाकाने सामूहिक बलात्कार करण्यात आला. मुलगा हवा अशी कामना बाळगणाऱ्या सुमारे १०० महिलांना कृपेचे आमिष दाखवून बलात्कार केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या कुणा परमानंद आश्रमात तर डॉक्टरांच्या देखरेखीखाली स्त्री भ्रूणहत्येचा कारखानाच सुरू असल्याचे उघडकीस आले. नाशिक जिल्ह्यातील खरात नावाच्या भोंदूच्या कारवाया उघड होऊ लागल्यामुळे जुन्या घटनांचा हा संपूर्ण पट पुन्हा उलगडणे अपरिहार्य ठरले असून काळ पुढे सरकत असला तरी महिलांच्या सुरक्षिततेबाबत आपण कोठे आहोत, हे प्रश्नचिन्ह मात्र आहे तेथेच आहे.

एकापाठोपाठ एक घडणाऱ्या अशा घटनांमुळे, मुलीचा जन्म म्हणजे असुरक्षिततेला आमंत्रण असा समज समाजात फैलावू लागला, तर त्याचे खापर कोणावर फोडायचे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. बालविवाह रोखण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली. आठ-दहा दिवसांपूर्वी, अक्षय्य तृतीयेच्या दिवशी, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी समाजमाध्यमांवरून बालविवाह प्रथेच्या विरोधात सरकारच्या निर्धाराचा पुनरुच्चार केला, पण त्या वेळीदेखील त्यांनी केलेला एक गौप्यस्फोट समाजाला अस्वस्थ करणारा आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर राज्यात बालविवाह होत असल्याची माहिती त्यांनी दिली आणि बालविवाह रोखण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा असे आवाहन केले. त्यानंतर काही दिवसांतच, सोलापूर जिल्ह्यातील बालिका मातांच्या गर्भवती अवस्थेचे लाजिरवाणे चित्र स्पष्ट झाले होते. लहान वयातच त्यांच्यावर मातृत्व लादले गेले आणि ती बाब उघडकीस येऊनही कोणीच त्याविरोधात तोंडदेखील उघडले नाही, ही बाब त्याहूनही लाजिरवाणी ठरते. अमरावतीजवळील एका गावातील लैंगिक अत्याचाराचे प्रकरणही पाठोपाठ उघडकीस आले आणि मुलांच्या सुरक्षिततेच्या मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. अशा असुरक्षिततेमुळेच मुलगी ही जन्मदात्यांपुढे जोखीम ठरू लागली आणि मुलगी वयात येण्यापूर्वी तिची जोखीम सुरक्षित हाती सोपविण्याच्या मानसिकतेतून बालविवाहासारखी प्रथा वाढीस लागली, असे सांगण्यात येते. मुलगी ही धनाची पेटी नव्हे, तर जोखीम वाटावी अशी भयावह स्थिती आसपास असतानाही, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अशा घोषणा दिल्या जात आहेत. या घोषणांचा आदर करण्यासाठी समाजाने काय केले पाहिजे, याचे उत्तर शोधण्याची वेळ आली आहे. मुळातच, मुलींच्या जन्माचे गुणोत्तर कमी होत असताना असुरक्षिततेच्या भावनेत भर घालणारे हे भयानक प्रकार थांबले नाहीत, तर स्त्री-पुरुष संख्येतील विषमतेची दरी आणखीनच रुंदावण्याची भीती आहे. कदाचित, स्त्री सबलीकरणाच्या मोहिमांकडे नव्या नजरेने पाहण्याची, नव्या आखणीची गरज आता निर्माण झाली आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### लक्ष भोजन

आम्ही आठ भावंडं. पाच भाऊ, तीन बहिणी. वडील महसूल खात्यात. आई गृहिणी. फार शिकलेली नव्हती, पण वाचनाचा छंद होता. त्यामुळे ती सुसंस्कृत आणि चतुरस्र होती. स्वभाव अत्यंत शांत आणि आहे त्या परिस्थितीत संसार नेटका करण्याचं कौशल्य तिच्या ठिकाणी होतंच. वडिलांची नोकरी होती; त्या काळात पगार फारसा नव्हता. वडील एकटे कमावणारे. आर्थिक परिस्थिती बेताचीच. तशातच आमच्याकडे चुलत भाऊ-बहीण, मावसभाऊ असे नेहमीच कुणीतरी शिक्षणासाठी असायचे. आम्ही यवतमाळला राहत होतो. साधारण १९६८-६९ चा काळ असेल. त्यावेळी उमरखेड-पुसद येथे कॉलेज होते, पण परीक्षा केंद्र यवतमाळलाच असायचे. उन्हाळ्यात वडिलांच्या मित्रांची मुले-मुली आमच्याकडे हक्काने राहायला यायचे. घरासमोरच सरकारी दवाखाना होता. मग काय, ओळखीपैकी कुणीही आजारी पडले तरी त्यांना सरकारी दवाखान्यातच यावे लागत असे. त्यात आमचं घर जवळ त्यामुळे अडलीनडली बरीचशी मंडळी हक्काने आमच्याकडे यायची. चहा, गरम पाणी, उपमा, पोहे अशा बऱ्याचशा सेवा आमच्याकडून पुरविल्या जात असत. कधी कधी मोठे भाऊ थोडी कुरकुर करायचे, पण आमची आई म्हणजे 'शांतिब्रह्म.' भावांच्या कुरकुरीकडे दुर्लक्ष करून आणि तात्यांची (आम्ही वडिलांना तात्या म्हणायचो) काही तक्रार नाही म्हणून ती जमेल ते आणि जमेल तसं सगळं करायची. घर बरंच मोठं होतं. परीक्षेसाठी आलेली मुलं-मुली आमच्याकडे आपलंच घर समजून राहायचे. आपण कुणाच्या तरी अडचणीला कामी पडू शकतो हा आनंद आई-वडील दोघांनाही असायचा. बरं, दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यासाठी वेगळं काही करावं लागत नसे. घरच्यासाठी जे जेवणं बनायचं म्हणजे वरण, भात, भाजी, भाकरी किंवा पोळी, खिचडी जे असेल ते. ते येणाऱ्यांनाही आवडायचं. हे असं अनेक वर्षे चालू होतं.

परंतु, एकदा एक असा प्रसंग घडला आणि आई बरीच अस्वस्थ झाली. आमच्यापैकी तीन भाऊ आणि एक बहीण मोठे असल्यामुळे थोडे समजदार होते. त्यांना कदाचित आईच्या अस्वस्थपणाचं कारण समजलंही असेल; पण आम्हा लहानांना ते त्यावेळी फार काही कळलं नाही. नंतर पुढे समज आल्यावर घडलेला प्रसंग म्हणून आईनेच तो सांगितला. प्रसंग असा होता, नेहमीप्रमाणे वडील कामानिमित्त परगावी गेले होते. घरात किराणा सामान महिन्याचे एकदाच आणले जायचे. कधीतरी त्यातील काही जिन्नस संपायचे. वडील स्वतः किंवा मोठ्या भावांच्या हाताने ते लगेच आणले जायचे. पण यावेळी आमच्याकडे परीक्षेसाठी आलेल्या दोन मुली, आम्ही घरचे सर्व जण म्हणजे १०-१२ जणांचा स्वयंपाक करायला हवा होता. डब्यात गव्हाचे पीठ थोडेच होते आणि तेल वगैरे बहुतेक संपलेलं असेल. आई वैतागणे स्वाभाविक होते. नकळत तिची चिडचिड झाली. मोठ्या भावाने काहीतरी सोय केली. सामान नेहमीच्या दुकानातून आणलं. स्वयंपाक झाला, जेवणेही झालीत. सगळे जण आपापल्या कामाला निघून गेले. संध्याकाळी वडील परत आले आणि आईचा बांध फुटला. 'शांतिब्रह्म' अस्वस्थ झालेलं पाहून तात्याही थोडे बेचैन झाले. त्यांनी काय झाले म्हणून आईला विचारले!. जरा नाराजीच्याच स्वरात आई म्हणाली, 'आता हे फार झाले, कंटाळा आला या सगळ्या गोष्टींचा. कष्टाने करा आणि...!' असे म्हणून आई थांबली. झाला प्रकार तात्यांच्या लक्षात आला. लगेच ते म्हणाले, 'हे बघा! (तात्या आईला नेहमीच अहो-जाहो म्हणायचे.) आपण सामान्य माणसे. आपण काही पिढीजात श्रीमंत वगैरे नाही किंवा आपल्याला कुणी काही आणून देणारं नाही आणि दिलं तरी ते आपण घेणार नाही. हे मला आणि तुम्हालाही चांगलेच माहीत आहे.'

'आता समजा आपल्याला लक्ष भोजन घालावे, अशी इच्छा झाली तर ते शक्य आहे का? नाही ना! त्यापेक्षा रोज एक-दोन व्यक्ती आपल्या व्यतिरिक्त आपल्या घरी जेवल्या तर केव्हातरी भगवंताच्या डायरीत आपल्या लक्ष भोजनाची नोंद होईल की नाही! आणि ते पुण्य आपल्यालाच नाही तर आपल्या पुढच्या पिढीलाही कामी पडेल, हे आपल्याला वेगळं सांगायला नकोच. तेव्हा आता जे चाललं आहे ते चांगलं आहे, असं समजून चालू द्यायचं!' त्यानंतर आईने कधीही कुरकुर केलेली आम्हाला आठवतं नाही.

**लता पाध्ये**/९४२२५३३७०५

### ३ मे : जगदीश खेबूडकर यांना आदरांजली

''फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार, विठ्ठला, तू वेडा कुंभार...'' या ओळी ज्यांच्या लेखणीतून उतरल्या, ते थोर शब्दप्रभू म्हणजेच जगदीश खेबूडकर. मराठी चित्रपटसृष्टी आणि भावसंगीत विश्वावर तब्बल चार-पाच दशके अधिराज्य गाजवणारे खेबूडकर आज आपल्यात नसले, तरी त्यांची गाणी आजही प्रत्येक मराठी घराघरात गुंजत आहेत. ३ मे रोजी त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त या महान साहित्यिकाच्या प्रवासाचा हा एक छोटासा प्रयत्न. १० मे १९३२ रोजी कोल्हापूरच्या पन्हाळा तालुक्यातील कळे या गावी जगदीश खेबूडकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील शिक्षक होते आणि घरातूनच त्यांना साहित्याचे बाळकडू मिळाले. कोल्हापूरच्या मातीत वाढल्यामुळे तिथली लोकसंस्कृती, लावणी आणि शब्दांची लय त्यांच्या रक्तात भिनली होती. शिक्षकी पेशात असतानाच त्यांनी कविता आणि गीते लिहिण्यास सुरुवात केली. गदिमांच्या प्रभाव असलेल्या त्या काळात खेबूडकरांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. जगदीश खेबूडकर यांचे लेखन अफाट होते. त्यांनी केवळ मनोरंजन म्हणून गाणी लिहिली नाहीत, तर ती संस्कृतीचा भाग बनली. त्यांनी ३२५ हून अधिक मराठी चित्रपटांसाठी गीते लिहिली. त्यांच्या नावावर ३५०० हून अधिक गाणी आणि कवितांची नोंद आहे. यामध्ये चित्रपटगीते, भावगीते, भक्तिगीते आणि लावण्यांचा समावेश आहे. त्यांनी नाटके, काही कथासंग्रह आणि पोवाड्यांचेही लेखन केले. खेबूडकरांच्या लेखणीत विलक्षण ताकद होती. त्यांनी शृंगारिक लावण्यांपासून ते आध्यात्मिक अभंगांपर्यंत सर्व काही लीलया हाताळले. अष्टविनायका तुझा महिमा, विठ्ठला तू वेडा कुंभार, विठूमाउली तू माउली, देहाची तिजोरी, यांसारखी गाणी आजही भक्तीचा ओलावा जपून आहेत. 'सांगत्ये ऐका'मधील लावण्या असोत किंवा पिंजरा चित्रपटातील दिसला गं बाई दिसला आणि छबीदार छबी, या लावण्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला सुवर्णकाळ दाखवला. श्रावणात घननिळा बरसला हे गीत आजही पावसाळ्यातील प्रत्येकाच्या ओठावर असते. आकाशी झेप घेरे पाखरा, ऐरणीच्या देवा, बाई बाई मनमोराचा अशी अनेक गीते जी कालबाह्य होणे शक्यच नाही. साहित्यातील योगदानासाठी त्यांना अनेक मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने गदिमा पुरस्कार, व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्कार, अनेक वेळा उत्कृष्ट गीतकार म्हणून, साहित्य सम्राट पुरस्कार इत्यादी. जगदीश खेबूडकर यांनी मराठी भाषेला अशा काही रचना दिल्या ज्या काळाच्या पडद्याआड कधीच जाणार नाहीत. ३ मे २०११ रोजी शब्दांचा हा जादूगार काळाच्या पडद्याआड गेला.



**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

### राजकारणातील अनैतिकतेचा प्रवास कुठवर?

सध्या देशाच्या राजकारणात जे काही होते आहे ते बघून देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या करोडो स्वातंत्र्य सैनिकांचा आत्मा निश्चितच तळमळत असेल. सत्ता मिळवण्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे जनतेचा विश्वास संपादन करणे, सत्ताधारी पक्षापेक्षा आपल्याकडे देशहिताच्या कोणत्या योजना आहेत हे मतदारांना पटवून देणे, आपण सत्तेवर असतो तर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काय वेगळे केले असते हे जनतेला सांगणे, जनतेचा विश्वास संपादन करणे, देशहिताच्या मुद्द्यांवर सत्ताधारी पक्षाचे समर्थन करणे हे करण्याऐवजी विरोधी पक्षनेते २०१४ पासून नेमके याउलट करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींवर कठोर शब्दांत टीका करणे, देशाची देशात आणि देशाबाहेर बदनामी करणे, जनादेशाचा अपमान करणे हेच सुरू आहे. पराभवाची कारणे शोधून त्यावर आत्मपरीक्षण करणे आदि प्रक्रिया तर विरोधी पक्षनेते विसरूनच गेले आहेत. मोदींची, भाजपची आणि रालोआची बदनामी केली तरच जनता आपल्याला सत्ता बहाल करेल असा अजब समज विरोधी पक्षांनी करून घेतला आहे. संवैधानिक संस्थांच्या प्रामाणिकपणावर संशय घेणे, त्यांच्या संवैधानिक कर्तव्यांची पूर्तता करण्यामध्ये अडथळे निर्माण करणे, हिंसाचार पसरवणे, संवैधानिक संस्थांना उघड आणि जाहीरपणे धमक्या देणे, न्यायालयांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, सरकारविरोधात जनतेला भडकावणे, देशातील जेन झी ला उठाव करण्यास उद्युक्त करणे, देशभरात अराजकता, हिंसाचार पसरवण्यासाठी प्रयत्न करणे असे अनेक प्रकार विरोधी पक्ष करत आहेत. अशा प्रकारच्या कामांमुळे सरकारी पक्षाचाच फायदा होतो आहे आणि आपण हे करणे आत्मघातकीपणा आहे एवढीही समज नसल्यामुळे विरोधी पक्षांनी आपल्याही पक्षाचे अस्तित्व धोक्यात टाकले आहे. सत्ताप्राप्तीसाठी विरोधी पक्ष मोदीविरोध करता करता देशविरोधी होऊ लागले आहेत याचेही कोणाला भान राहिलेले नाही.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत तर विरोधी पक्षांचे खरे आणि विद्रूप चित्र जनतेसमोर आले आहे. काँग्रेससारख्या देशातील सर्वांत जुन्या आणि सर्वांत जास्त काळ सत्ता भोगलेल्या पक्षाने तर पोरकटपणाची पराकाष्ठा केली आहे. एका राज्यात ज्या पक्षाबरोबर आघाडी आहे त्याच पक्षाला दुसऱ्या राज्यात विरोध करणाऱ्या काँग्रेसला राजकीय समज आहे यावर शुद्धीवर असलेला कोणीही माणूस विश्वास ठेवणार नाही. बापूंचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी जनतेला सर्वकाळ गृहीत धरण्याची घोडचूक काँग्रेस करत आहे. जनता म्हणजे, मुकी बिचारी कुणीही हाका, आहे असाही काँग्रेसच्या नेत्यांचा समज झाला आहे. गांधी-नेहरू परिवाराच्या तथाकथित त्यागाचा जीवावर राजकारण करणे इतिहासजमा झाले आहे हे काँग्रेसच्या लक्षात येत नाही.

तात्पर्य काय तर राजकारणातील नैतिकता जपण्यासाठी विरोधी पक्ष गांभीर्याने प्रयत्न करत नाहीत आणि देशविरोध आणि मोदीविरोध यातील फरक समजून घेत नाहीत, तोपर्यंत जनताजनार्दनाचा विश्वास संपादन करणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### १०१ व्या दिवशी तरी मराठी बोलतील का?

परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाला अखेर सरकारने शंभर दिवसांची मुदत दिली. आगामी शंभर दिवसांत जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सीचालकांना मराठी बोलता आली नाही तर त्यांचा परवाना रद्द करण्यात येईल असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदत दिल्यानंतर हा वाद तूर्त शांत झाला असला तरी प्रश्न पडतो की जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सीचालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकू शिकले नाहीत ते अवघ्या १०० दिवसांत मराठी शिकतील का? मराठी शिकण्याची या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सीचालकांची मानसिकता आहे का? आणि जर त्यांची मानसिकताच नसेल तर १०० दिवस काय १०० वर्षांची मुदत दिली तरी ते मराठी शिकणार नाहीत आणि जर ते १०० दिवसांत मराठी शिकले नाही तर १०१ व्या दिवशी सरकार त्यांचे परवाने खरोखरच रद्द करेल का? की त्यांच्या मुजोरीला बळी पडून पुन्हा मुदत वाढ देईल? सरकारने आता या मुजोर चालकांना आणखी मुदतवाढ देऊ नये. अनेक वर्षे महाराष्ट्रात राहूनही मराठी न शिकणाऱ्या या रिक्षा, टॅक्सीचालकांवर कारवाई व्हायलाच हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

# पोषण ट्रॅकर कुपोषणासाठी डेटाचा वापर

## दखल

प्रा. लिंडसे जॅक्स

आपले डॉक्टर आरोग्यविषयक माहिती इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदवून ठेवतात, ही गोष्ट आता आपल्यापैकी बऱ्याच जणांना सवयीची झाली आहे. काही काळानंतर आपल्या आरोग्याच्या या नोंदींचा मागोवा घेऊन, आपल्या आरोग्याला उद्‌भवू शकणाऱ्या धोक्यांची अगोदरच जाणीव करून देऊन त्यावर वेळीच कृती करण्यासाठी या माहितीची मदत होण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. केवळ माहिती संकलित करतात म्हणूनच नव्हे, तर या माहितीची वेळीच योग्य निर्णय घेण्यासाठी आणि आरोग्याची अधिक चांगल्या प्रकारे काळजी घेण्यास मदत होत असल्याने डिजिटल प्रणाली अतिशय उपयुक्त ठरत आहेत.



महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या वतीने २०२१ मध्ये पोषण ट्रॅकर हे ॲप सुरू केल्यापासून, पोषण सेवा वितरणाशी संबंधित डेटा अधिक कृतिशील बनवण्याचा प्रयत्न राहिला आहे. केवळ डिजिटायझेशनसाठीच नाही तर बालकांची वाढीची तसेच पोषणाशी संबंधित सेवांची नोंद ठेवून त्यांचा अधिक गांभीर्याने आणि सातत्याने आढावा घेतला जावा हा या ॲपचा उद्देश आहे.

वाढीबाबत नियमितपणे संकलित केलेल्या माहितीचे शेवटच्या टप्प्यात परिणामकारक निर्णयात रूपांतर करण्याची पोषण ट्रॅकरमध्ये क्षमता आहे. मासिक वाढीचे निरीक्षण - जर योग्यरीत्या त्याची मोजदाद केली गेली आणि त्यांची नियमित नोंद ठेवली गेली तर धोक्याची चिन्हे अगोदरच लक्षात येऊ शकतात. बालकांच्या वाढीत कशी प्रगती होत आहे, हे लक्षात घेऊन घरगुती शिधावाटपाच्या माध्यमातून पूरक आहार पुरवणे, काळजीवाहकांचे समुपदेशन आणि अतिप्रमाणात कुपोषित मुलांना आरोग्य केंद्रांमध्ये पाठविणे अशा उपायांची जोड देण्यासाठी केवळ एकाच गोष्टीची म्हणजे नियमितपणे ठेवल्या गेलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींची मदत होऊ शकते. या दिशेने पुढे जाण्यासाठी आपल्याला आपले लक्ष डॅशबोर्डकडून निर्णय घेण्याकडे आणि मापे नोंदविण्याऐवजी योग्य काळजी कशी घेता येईल, याकडे वळविणे गरजेचे आहे. अंगभूत वैशिष्ट्ये, मुख्य गोष्टींची साधी यादी आणि सतर्कता यामुळे अंगणवाडी सेविकांना कृशता किंवा अत्याधिक कुपोषणाचा धोका असलेल्या मुलांच्या वाढीवर देखरेख ठेवण्यास मदत होऊ शकते. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आणि आरसीएच २.० पोर्टलवरील डेटाचे एकत्रीकरण केल्यास, समन्वित गृहभेटींद्वारे संबंधित मुलांच्या वाढीवर लक्ष ठेवण्याच्या कामाला बळ मिळू शकते.

सध्या संकलित केलेला वाढीचा डेटा नेमकी कुठून सुरुवात करावी याचा मार्ग दाखवण्याच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा आहे. वाढीचे मापन करण्याच्या पद्धती आणि व्यवस्थेचा पाठिंबा आणखी कसा वाढेल यावर लक्ष केंद्रित करण्यासोबतच, तो वेळीच निर्णय घेण्यासाठी खात्रीशीरपणे सहायक ठरू शकतो. अचूक निर्णय ज्या मूलभूत गोष्टींवर अवलंबून असतात, अशा गोष्टी म्हणजे खात्रीशीरपणे घेतलेली मापे, योग्य तंत्र आणि कार्यक्षम उपकरणे. जर मुलाच्या उंचीत किंवा वजनात एका महिन्यातून दुसऱ्या महिन्यात आश्चर्यकारक किंवा मोठा बदल दिसत असेल, तर व्यवस्थेने त्याची तत्परतेने पडताळणी करणे किंवा पुन्हा मापे घेणे आवश्यक ठरते. ॲपमध्ये असलेले छोटे मायक्रो-व्हिडीओ, आरोग्य सेवा केंद्रांच्या ठिकाणचे वजनकाटे आणि उंची मोजण्याच्या पाट्यांच्या योग्य वापराला बळकटी देऊ शकतात. प्रत्येक अंगणवाडी केंद्रात कॅलिब्रेटेड आणि कार्यक्षम उपकरणे असतील, याची खबरदारी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वाढीच्या निरीक्षणाच्या नोंदींच्या डेटाची उपयुक्तता वाढण्याच्या दृष्टीने या मूलभूत गोष्टी गरजेच्या आहेत.

डॅशबोर्डऐवजी निर्णय घेण्याकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी पोषण ट्रॅकर डेटाच्या विश्लेषणाची मदत होऊ शकते. सर्वप्रथम आपल्याला हे जाणून घेणे आवश्यक आहे की नेमक्या कोणत्या काळात म्हणजे बाळाच्या कोणत्या वयात, ते काही महिन्यांचे असताना किंवा वर्षाचे झाल्यावरच्या काळात त्याचे कुपोषण होण्याची जास्त शक्यता असते. ते जन्माच्या वेळीच कुपोषित असते का, की ज्या काळात मातांना केवळ स्तनपान देण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, तो ० ते ३ महिने किंवा ३ ते ६ महिने यापैकी कोणता काळ महत्त्वाचा आहे? की, बाळाला जेव्हा पुरेसा, योग्य आणि सुरक्षित पूरक आहार देणे आवश्यक असते, तो ६ महिने ते १ वर्ष हा तो काळ असतो का?

पोषण ट्रॅकर डेटाच्या विश्लेषणातून, कुपोषणातून बरे होणाऱ्या मुलांबद्दल अधिक माहिती मिळण्यास मदत होऊ शकते. विशिष्ट जिल्ह्यांमधील मुलांच्या बरे होण्याची शक्यता अधिक असते का? खरीप पिकांच्या कापणीच्या काळात मुले बरी होण्याची शक्यता जास्त असते का? या प्रश्नांची उत्तरे त्यातून मिळू शकतात. त्याचप्रमाणे अशा विश्लेषणातून बालपणी वारंवार किंवा दीर्घकाळ कुपोषणाचा सामना करणाऱ्या मुलांबद्दल अधिक माहिती मिळू शकते. ही अशी मुले जन्मतःच कुपोषित होती आणि त्यानंतरही पूर्णपणे बरी होऊ शकलेली नाहीत? ही मुले ज्यांच्या घरांना नियमितपणे शिधावाटपाचा लाभ मिळत नाही, अशापैकी आहेत का? ही माहिती उपलब्ध झाल्यास, स्थानिक पातळीवर पोषण सेवा वितरणात सुधारणा करता येऊ शकेल.

डेटाची विश्वासार्हता वाढविणे फ्रंटलाईन कर्मचाऱ्यांचा कामाचा भार कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. प्रणालीवरील विश्वास वाढत असल्यामुळे अंगणवाडी सेविका प्राथमिक नोंद म्हणून ॲपचा अधिकाधिक वापर करू लागल्या आहेत. तथापि, अनेक ठिकाणी असलेल्या कनेक्टिव्हिटीच्या मर्यादा किंवा अनुपालनाच्या अटींमुळे सुरक्षित मार्ग म्हणून अजूनही डिजिटल नोंदीसोबत कागदी वह्यांमध्येही लिखित स्वरूपात नोंदी ठेवल्या जातात. ऑफलाईन कार्यक्षमता मजबूत करणे, डेटाची विश्वसनीयता वाढविणे आणि डिजिटल-फर्स्ट कार्यपद्धतीत स्पष्टता आणणे अशासारख्या उपायांमुळे सेवेच्या ठिकाणी डेटा एंट्रीच्या रूपात होणारे संक्रमण अधिक वेगाने होण्यास आणि दोन दोनदा अहवाल देण्याची आवश्यकता कमी करण्यास मदत होऊ शकते. प्रणाली सुधारण्याच्या प्रक्रियेत फ्रंटलाईन कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेतल्यास ॲप त्यांच्या कामात सहायक ठरेल, हे सुनिश्चित करण्यासही मदत होऊ शकते.

पोषण ट्रॅकर हे वेळीच आणि माहितीवर आधारित निर्णय घेण्यासाठीचे विश्वसनीय साधन आहे. संभाव्य धोके वेळीच ओळखणे, जलद पाठपुरावा करणे आणि पोषण सेवांमध्ये अधिक समन्वय साधणे, ही त्याची खरी ताकद आहे. शेवटच्या टप्प्यातील वास्तवासाठी तयार केलेला आणि डेटाची गुणवत्ता व वापरामध्ये सतत होणाऱ्या सुधारणांमुळे अधिक प्रभावी झालेले पोषण ट्रॅकर हे केवळ निरीक्षण करण्याचेच नाही तर पोषण सेवा वितरण अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वार्थाने उपयुक्त साधन आहे.

(लेखिका एडिनबर्ग विद्यापीठात 'जागतिक आरोग्य आणि पोषण' या विषयाच्या प्राध्यापक आहेत.)

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दरबारात एकत्र येतात : आ. संदीप क्षीरसागर

तभा. वृत्तसेवा

**बीड** | वारकरी संप्रदायात संत बंकट स्वामी यांचे खूप मोठे योगदान आहे. वारकरी संप्रदाय खूप मोठी ताकद आहे म्हणून एवढे सारे लोक एकत्र येतात..आज या कार्यक्रमात उपस्थित होण्याचे भाग्य लाभले, संस्थांच्या विकासात महाराजांनी दिलेला शब्द खाली पडू देणार नाही सर्व पक्ष एकत्रित येऊन काम करू असं संदीप क्षीरसागर म्हणाले.

४) नेकनुर संस्थांच्या विकासात मुंदडा कुटुंब नेहमी प्रयत्नशील - अक्षय भैय्या मुंदडा

संत बंकट स्वामी महाराज संस्थान च्या विकासासाठी या अगोदरही निधी दिलेला आहे कीर्तन मंडपासाठी निधी दिलेला आहे तर तीर्थक्षेत्र विकास मधून व पर्यटनमधूनही मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून मूलभूत कामे केली जातील. संस्थांच्या विकासाच्या बाबतीत आम्ही कुठेही मागे पडणार नाही असं अक्षय भैय्या मुंदडा यांनी सांगितलं..



१) सप्ताहामध्ये महाप्रसाद ११० पोते साखर , ७० क्विंटल दाळ तर तेल ४७ टाकी आणि १००० पोते मुरमुरे यामुळे १ लाख ते दीड लाख भाविक भक्तगण प्रसाद घेवुन तृप्त झाले. भाविक भक्तांसाठी जार च्या थंडगार पाण्याची व्यवस्था केली होती. २) महापंगतीमध्ये प्रसाद वाढण्याचे महत्वाचे काम नेकनूरच्या महिलां ग्रुप यांनी केले.यामुळे प्रत्येकाला महाप्रसाद वेळेवर मिळाला.विशेष म्हणजे.१००० महिलांनी हें काम पार पाडलें. ३) नेकनूर मधील गणेश मंडळाच्या तरुण मंडळानी पार्किंग, पाणी, स्वच्छता, सुरक्षा, सर्व चोख व्यवस्था करण्यासाठी मोठी मेहनत घेतली.अन्नदान कमेटीने सर्वांनां मार्गदर्शन केले फोटो ओळ ४)नेकनूर येथे भव्य अखंड हरीनाम सप्ताहात काल्याचे कीर्तन करताना श्री ह भ प ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर हजोरोच्या संख्येने भाविक भक्त,महिला ,पुरुष उपस्थिति होते.

## जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सुनीता नरंगलकर यांचा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरव

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | सामाजिक क्षेत्रात गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या श्रीमती सुनीता श्रीपतराव नरंगलकर यांना जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र व रुपये १०,००१ रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.



श्रीमती नरंगलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान तसेच कौटुंबिक समुपदेशन या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. कौटुंबिक सल्ला केंद्राच्या माध्यमातून त्यांनी अनेक कुटुंबांतील तणाव कमी करून नातेसंबंध दृढ करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत त्यांनी एकूण १७१ प्रकरणांवर समुपदेशन केले असून त्यापैकी १३४ प्रकरणे निकाली काढण्यात यश मिळवले आहे, तर ३१ प्रकरणे पोलिसांकडून संदर्भित करण्यात आली होती.

तसेच कोविड काळात जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जनजागृती, स्वच्छता व आरोग्य मार्गदर्शन केले.

## देवगांव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

तभा. वृत्तसेवा

**केज (प्रतिनिधी)** | तालुक्यातील देवगांव येथे दि.३० एप्रिल गुरुवार रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती गावातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.



केज तालुक्यातील देवगांव येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती निमित्ताने दि.३० एप्रिल गुरुवार रोजी सकाळी समाज मंदिरा समोरील भव्य प्रांगणात कृष्णा बँकेचे चेअरमण तथा माजी जि.प.सदस्य विजयकांत भैय्या मुंडे,सरेश गायकवाड नवीमुंबई, उपसरपंच सुभाष मुंडे,रामू नागरगोजे,अमोल मुंडे,एकनाथ गायकवाड,यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.या ठिकाणी महामानव तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच पुजन करुन बुध्दवंदना घेण्यात आली.यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्याचे भीम जयंती उत्सव समीतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी पुष्पहार देऊनस्वागत केले.ही जयंती यशस्वी करण्यासाठी डॉ.शरद गायकवाड, अर्जून गायकवाड,अरुण कांबळे, चिवळा गायकवाड,राणू कांबळे, लिंबाजी गायकवाड,दैवान कांबळे, विशाल गायकवाड,अजय कांबळे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेऊन ही जयंती साजरी केली.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महादेव गायकवाड यांनी केले.

# मुख्यमंत्री देणार समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांना न्याय ?

## ४३ दिवसानंतरही कर्मचारी आझाद मैदानावर ; २५७ कर्मचाऱ्यांचा सेवेदरम्यान मृत्यू

तभा. वृत्तसेवा

**केज** | प्रतिनिधी

मागील २० ते २५ वर्षापासून शासन सेवेत कायमच्या प्रतीक्षेत असलेले समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजारांवर कर्मचारी ९ मार्चपासून तीन हजारवर कर्मचारी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आणि अन्नत्याग आंदोलन करत आहे. आई वडील सेवेत कायम व्हावे यासाठी अनेक चिमुकले आई वडिलांसह या आंदोलनात सहभागी झाले. ४३ दिवसापासून हे आंदोलन सुरू असून मुख्यमंत्री समग्र शिक्षा अभियानातील उर्वरित अर्ध्या कर्मचाऱ्यांना न्याय देतील का ? याकडे शिक्षण विभागातील सर्वांचे लक्ष लागले आहे.



आंदोलनाचे ४३ दिवस : सरकारचे लक्ष आपल्या मागणीकडे वेधण्यासाठी कधी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून मुख्यमंत्री यांचेकडे स्वेच्छा मरणाची परवानगी मागितली. कधी रस्ता रोको, कधी झाडावर चढाई, थाळीनाद, गाण्यांच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचे काम केले.

सन २००१ पासून समग्र शिक्षा अभियान सुरू झाले त्याच वेळी विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण व शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी विषयसाधन व्यक्ती, विशेष शिक्षक, डेटा एंट्री ऑपरेटर, लेखा, एम आय एस कोऑर्डिनेटर, इंजिनिअर, जिल्हा समन्वयक, सहायक कार्यक्रमाधिकारी अशी अनेक पदे सहा-सहा महिन्यांच्या करारावर व मानधन तत्त्वावर भरली गेली होती. सेवेत लागल्यापासून समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांचे अधिवेशनावरील हे १६ वे आंदोलन आहे. गत २० ते २५ वर्षात प्रत्यक्ष सेवेदरम्यान तब्बल २५७ कर्मचारी विविध कारणाने मृत्यूमुखी पडले. याच अभियानातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना २०२४ मध्ये शासनसेवेत कायम केले.

## स्वा सावरकर कनिष्ठ महाविद्यालयाची निकालाची यशस्वी परंपरा ; विज्ञान शाखा 100% निकाल

तभा. वृत्तसेवा

**बीड ( प्रतिनिधी )** | एच एस सी १२वी बोर्ड परिक्षा फ्रेबु २०२६ चा निकाल २ मे २६ रोजी online जाहीर झाला या वर्षी स्वा सावरकर कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल उत्कृष्ठ लागला विद्यालयात विविध विभाग यात विज्ञान शाखा १००% कला शाखा ७१ .७९ % व एच .एस .व्ही .सी . शाखा ९८.१५ % असा लागला आहे

विद्याल्यातील गुणवंत विद्यार्थी

विज्ञान शाखेतून विद्यालयातून

प्रथम कु ठोसर भार्गवी श्रीकांत ७५.३३% गुण , व्दितीय कु स्वामी अदिती विश्वनाथ ७३ . ३३ %

तृतीय यश शरद ढवळे ७२ ५० %

कला शाखा : - प्रथम तुलसी संजय जव्हेरी ७४.६७%, .व्दितीय गायत्री रामप्रसाद घुमरे ६०. O०% .तृतीय

सनी संजय चव्हाण ५७.६७%

अकोटिंग व ऑफिस मॅनेजमेंट .प्रथम गवळी प्रणव शिवाजी ७२.१७%, व्दितीय परसे सिद्धी संदीप ६६. ५ O %

बैंकिंग अॅन्ड फायनाशियल इन्शुरन्स

प्रथम जवळेकर गौरव निलेश ६८.१७% व्दितीय चव्हाण सौरभ सुभाष ६७.३३% लॉजिस्टिक अणु चे न सप्लाय मॅनेजमेंट प्रथम वेताळ पूनम ६३.८३% व्दितीय भोपळे साक्षी ५७. ६७% एम एलटी प्रथम

पठाण सनासदाफ निसार खाँ ५८.८३%,व्दितीय जाधव प्रणाली अशोक ५८% , गुण प्राप्त केले आहेत .

या सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे १२वी उतीर्ण विद्यार्थाचे अभिनंदन विद्यालय वतीने डॉ. सुरेंद्र आलूरकर अध्यक्ष भा.शि.प्र संस्था , डॉ. हेमंत वैद्य कार्यवाह भा.शिप्र संस्था, सत्यनारायण लोहिया कोषाध्यक्ष,

प्राचार्य प्रा चंद्रकांत मुळे भा .शि .प्र संस्था प्रशासकीय समन्वयक उमेश जगताप विद्यासभा उपाध्यक्ष, डॉ अविनाश देशपांडे कार्यवाह स्थानिक व्यवस्था मंडळ , डॉ. पुरुषोत्तम कुलेकर्णी अध्यक्ष स्थानिक व्यवस्था मंडळ ,प्रमोदराव कुलकर्णी शालेय समिती अध्यक्ष ,हरीभाऊ साबळे पर्यवेक्षक

विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, विजेंद चौधरी सर्व संस्था पदाधिकारी सभासदशिक्षक प्राध्यापक कर्मचारी यांनी केले आहे .



## गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावरील दाखल झालेला खोटा गुन्हा न्यायालयाने अखेर रद्द केला तक्रारदाराविरुध्द अब्रु नुकसानीचा दावा दाखल

तभा. वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी** | याविषयी सविस्तर वृत्त असे की गेली २२ वर्षे शिक्षण क्षेत्रात सेवा बजावत असताना दि. ०१/१२/२०२३ पासून केज तालुक्यात गट शिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते या कार्यकाळात २४५ जि.प. व एकूण २६८ शाळांचे कामकाज सुरळीत व पारदर्शक पद्धतीने सुरू होते . तालुक्यातील जनतेने माझ्या कामाची अनेकदा प्रशंसा केली आहे. मला बदनाम करण्याच्या हेतुने श्रीमती लता उमेश शिंदे व पल्लवी उमेश शिंदे, रा. समर्थ नगर, केज यांनी दि. १९/०१/२०२५ रोजी केज पोलीस स्टेशन येथे कलम ७४, ७५(१), ७५(२), ३५४(२), ८, १२ अंतर्गत माझ्या विरुध्द खोटी व बदनामी कारक फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्याद ही पूर्वनियोजित कट होता माझी सामाजिक व शैक्षणिक प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने जाणीव पूर्वक करण्यात आली आहे. एक जबाबदार अधिकारी म्हणून मी कायद्याचा व महिलांच्या सन्मान कायम आदर केला आहे. माझ्यावर लावलेले सर्व आरोप बिनबुडाचे, तथ्यहीन व सूडबुद्धीने केलेले आहेत. या बाबद औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ५/ ३ /२०२६ रोजी च्या निकालात सदरील गुन्हा रद्द केला आहे.

या खोट्या गुन्ह्यामुळे माझी व माझ्या कुटुंबाची नाहक बदनामी झाली असून, मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे माझे वकील अॅड. बी. एल. यादव यांच्यामार्फत दि. २७/०४/२०२६ रोजी संबंधितांवर ५० लाख रुपयांची अब्रु नुकसानीची व ५,००० रुपये नोटीस खर्चाची कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.

## सेवानिवृत्त शिक्षक दिलीप बोराडे यांचा चौसाळ्यात सत्कार; 35 वर्षांच्या सेवेला सलाम

तभा. वृत्तसेवा

**बीड** | तालुक्यातील चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक दिलीप बोराडे गुरुवारी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ आणि उल्लेखनीय सेवेनिमित्त शाळेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मजा हम्पे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रेमचंद (बाबूशेठ) लोढा तसेच जिल्हा परिषद सदस्य आणि भाजपा बीड शहर अध्यक्ष अशोक लोढा उपस्थित होते.



यावेळी बोलताना बाबूशेठ लोढा म्हणाले की, “शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असतो. दिलीप बोराडे यांनी ३०-३५ वर्षे विद्यार्थ्यांना ज्ञानदान करून अनेक यशस्वी विद्यार्थी घडवले आहेत.”

त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तळमळीने केलेल्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य व सुखसमृद्धीच्या शुभेच्छा दिल्या.

## वैद्यनाथ बँकेच्या प्रगतीचा ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडून आढावा

### बँकेच्या आर्थिक कामगिरीचे केले कौतुक ; एनपीए शुन्य टक्के तर एकूण नफा ८ कोटी

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ दि. ०२** | लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रेरणेने मराठवाड्यातील अग्रगण्य बँक असेलेल्या दि. वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या कामकाजाचा व आर्थिक प्रगतीचा राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा बँकेच्या ना. पंकजाताई मुंडे यांनी आज बँकेची मार्गदर्शक या नात्याने आढावा घेतला.

बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हा चेअरमन रमेश कराड व संचालक मंडळ व अधिकारी यांनी यहबँकेच्या आर्थिक स्थितीबाबत सविस्तर माहिती सादर केली. ३१ मार्च २०२६ रोजी अखेर बँकेच्या ठेवी ६९६ कोटी असून एकूण कर्ज ४६५ कोटी, गुंतवणूक ३९६ कोटी, सी.आर.ए.आर. १८.१७ टक्के, निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के, एकूण नफा ८.०१ कोटी व निव्वळ नफा ४.०४ कोटी इतका आहे.



बँकेच्या प्रगतीचे कौतुक

ना. पंकजाताई मुंडे यांनी बँकेच्या आर्थिक कामगिरीचे कौतुक करत, बँकेने वित्तीय शिस्त राखत प्रगती साधल्याचे नमूद केले. तसेच बँकेचे निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के केल्याने संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच यापुढे अजून एन.पी.ए. कमी करणे, कर्जवाटपावर प्रभावी नियंत्रण ठेवणे, ग्राहकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्याबाबत तसेच मोबाईल बँकिंग, यु.पी.आय. अशा सेवा तत्पर सुरु करणेबाबत मार्गदर्शन केले.

बँकेचे संचालक व अधिकारी यांनी बँकेची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्यासाठी, पारदर्शकता वाढविण्यासाठी व ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवण्याचा विश्वास व्यक्त केला. बँकेच्या मार्गदर्शक ना. पंकजाताई मुंडे, संचालिका व माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँक भविष्यात आणखी प्रगतीपथावर नेऊ असे आश्वासन दिले.

# गेवराईत अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा जप्त; २० लाख 30 हजारांचा मुद्देमाल ताब्यात

तभा. वृत्तसेवा

**गेवराई** | गेवराई पोलिसांनी अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला असून, ३ मे २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास केलेल्या कारवाईत ६ ब्रास वाळूसह एक हायवा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाळू माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी ही मोहीम आखली होती. ३ मे रोजी पहाटे ३:५० च्या सुमारास गेवराई बायपास रोडवरील नॅशनल हायवे क्रमांक ५२ वर पेट्रोलिंग करत असताना, दत्तराज पार्कच्या कमानीजवळ वाळूने भरलेला हायवा (क्रमांक AP३९TQ१२३९) पोलिसांना आढळून आला.

या हायवाची तपासणी केली असता, तो अवैध वाळू वाहतूक करत असल्याची खात्री पटली. पोलिसांनी हायवा चालक सय्यद शाकेर सय्यद हसन (वय ४६ वर्षे, रा. लिंबागणेश, जि. बीड) याला हायवासह ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गु.रं.नं. २७०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

• जप्त मुद्देमाल: ६ ब्रास वाळू आणि हायवा (एकूण किंमत २०,३०,०००/- रुपये). • आरोपी चालक: सय्यद शाकेर सय्यद हसन. • ठिकाण: नॅशनल हायवे ५२, गेवराई बायपास रोड. • दाखल गुन्हा: कलम ३०३(२) भा.न्या.सं..

## नायगावच्या भूमिपुत्राची पोलिस दलात दमदार एन्ट्री

**केज** | तालुक्यातील नायगावचे भूमिपुत्र प्रशांत प्रभाकर कुलकर्णी याने महाराष्ट्र शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश मिळवत पोलिस दलात आपल्या जिद्दीच्या बळावर दमदार एन्ट्री केली आहे. त्यांची नियुक्ती जिल्हा पोलिस म्हणून मुंबईतील मीरा-भाईंदर येथे झाली असून, या यशामुळे संपूर्ण गावात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामान्य कुटुंबातून येत प्रशांतने मोठी स्वप्ने पाहिली आणि ती पूर्ण करण्यासाठी अविरत परिश्रम घेतले. स्पर्धेच्या कठीण टप्प्यांतून मार्ग काढताना त्याने जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने अनेक अडचणींना न जुमानता त्यांनी सातत्याने अभ्यास व शारीरिक तयारी करत हे यश आपल्या नावावर केले.



# गेवराईत पत्नीनेच केला पतीचा खून; ८ महिन्यांनंतर गुन्ह्याचा पर्दाफाश

तभा. वृत्तसेवा

**गेवराई** | कौटुंबिक वादातून पत्नीने आपली बहीण आणि मेव्हण्याच्या मदतीने पतीची गळा आवळून हत्या केल्याची धक्कादायक घटना गेवराई पोलिसांनी उघडकीस आणली आहे. उद्धव तुकाराम शिंदे (वय ५०) असे मृताचे नाव असून, ही हत्या सप्टेंबर २०२५ मध्ये करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी मृताची पत्नी संगीता शिंदे, मेव्हणी सविता वाजे आणि साडू विष्णू वाजे यांच्यासह अन्य आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत उद्धव शिंदे हे पत्नीसह पुण्याहून पांढरवाडी येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी आले होते. सततच्या भांडणामुळे त्रस्त असलेल्या संगीताने ६ सप्टेंबर २०२५ रोजी नातेवाईकांच्या मदतीने पतीचा गळा आवळून खून केला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांनी मृतदेह गोणपाटात भरून गोदावरी नदीत फेकून दिला, तसेच मृताची मोटारसायकलही नदीत टाकून दिली. गुन्हा लपवण्यासाठी पत्नीने पुण्यातील सिंहगड पोलीस ठाण्यात पती बेपत्ता असल्याची खोटी तक्रारही दाखल केली होती.



**घटनेचा मुख्य तपशील**

• घटनेची तारीख: ६ सप्टेंबर २०२५. • मृत व्यक्ती: उद्धव तुकाराम शिंदे (वय ५०). • आरोपी: पत्नी संगीता शिंदे, सविता वाजे (मेव्हणी), विष्णू वाजे (साडू). • कारवाई: गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं. २६८/२०२६ नुसार कलम १०३(१), २३८, ६६(२) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल.

बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी के १०० वर्ष– नए क्षितिज’ या विषयावरील सरसंघचालकांचे संघटन, आहेत. त्यांनी समित्या, कार्यपद्धती सल्ला, मार्गदर्शन ते मूळचे स्वयंसेवक आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे पुण्य त्यांच्याकडे आमच्यावर येते, ते आम्ही घेतो. कारण ते मुळात इथून गेले. तेवढा सभागृहात टाळ्यांचा कडकटाट झाला.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने यंत्रणांनी आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज रहावे

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

जिल्ह्यात पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य अतिवृष्टी, महापूर आदी आपत्तींचा सामना करण्यासाठी मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. त्यावेळी सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देत आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे व प्रतीक्षा भुते, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी प्रदीप कच्छवे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, नगर परिषद, अग्निशमन विभाग, जलसंधारण विभागासह सर्व संबंधित यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, महसूल व पोलीस स्टेशननिहाय अधिकाऱ्यांची तसेच त्यांच्या संपर्क क्रमांकांची अद्ययावत माहिती तयार ठेवावी. कृषि विभागाने संभाव्य महापुरामुळे होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्यासाठी मनुष्यबळासह यंत्रणा सज्ज ठेवावी. होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे केल्यानंतर आकडेवारीत एकवाक्यता ठेवावी, जेणेकरून नुकसानीचा अचूक अंदाज येईल. जिल्ह्यातील कालवे, साठवण तलाव, जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत बांधकामे तसेच नद्यांवरील केटीवेअर यांच्या दुरुस्तीबाबतची माहिती तात्काळ सादर करून कालवे व तलाव दुरुस्तीची सद्यस्थिती स्पष्ट करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुपता यांनी दिले.

पूरप्रवण ७० गावांतील अतिक्रमणधारकांना नोटीस देण्याच्या सूचना देत, पावसाळ्यात महापुराचा धोका असलेल्या गावांमध्ये दवंडीव्दारे नागरिकांना पूर्वसूचना द्यावी. गावांना पाण्याचा वेढा पडल्यास पर्यायी रस्त्यांची माहिती उपलब्ध ठेवावी. आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व संबंधितांचे संपर्क क्रमांक असलेली दिनदर्शिका तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यातील सर्व नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित ठेवावेत. कुशल जलतरणपटूंची संपर्क यादी तयार ठेवावी. आरोग्य विभागाने डॉक्टरांची उपलब्धता, संपर्क क्रमांक व प्रथमोपचार पेट्यांची तयारी ठेवावी. गटविकास अधिकाऱ्यांनी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था सुनिश्चित करावी.

रेल्वे प्रशासन व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने तात्काळ देखभाल व दुरुस्ती करून आठवड्याभरात अहवाल सादर करावा. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नद्या व नाल्यांचे खोलीकरण आवश्यक असलेल्या ठिकाणांचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, त्यानंतर जिल्हा प्रशासन त्यास मान्यता देईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.

सौरऊर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजना व प्रकल्पांचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. महापुरात संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी तयार ठेवावी तसेच नादुरुस्त रस्त्यांची दुरुस्ती करून घ्यावी. राज्य राखीव पोलीस दलाने सतर्क राहावे. उपप्रादेशिक परिवहन विभागाने आपत्ती काळात आवश्यक उपकरणे व वाहनांची व्यवस्था ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिले.

# कापडसिंगी शिवारात गांजा विक्री करणाऱ्यास पोलिसांकडून अटक

## १ लाख २० हजार किंमतीचा गांजा केला जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

सेनगाव तालुक्यातील कापडसिंगी शिवारात अवैधरित्या गांजा विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला सेनगाव पोलिसांच्या पथकाने शनिवारी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून १ लाख २० हजार रूपये किंमतीचा ४.८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक डॉ नीलाभ रोहन यांचे मार्गदर्शन खाली पोलीस स्टेशन सेनगाव च्या वतीने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मौजे कापडसिंगी येथे लोणार रोड लगत छापा मारून एका इसमास ताब्यात घेऊन नाव विचारले असता नंदाजी मोहन चव्हाण वय ३६ वर्षे राहणार खुरामपूर तालुका लोणार जिल्हा बुलढाणा असे सांगितले. त्याच्या जवळील पोत्याची पाहणी केली असता वाळलेला गांजा ४.८०० ग्राम किंमत १,२०,०००/- रुपये व एक मोटरसायकल किंमत ७०,००० रुपये, ०१ मोबाईल असा एकूण २,००,०००/- चा मुद्देमाल मिळून आल्याने कायदेशीर जप्त करून एनडीपीएस कायद्याने पोलीस स्टेशन सेनगाव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली पोलीस हा तर्फे सर्व नागरिकास आवाहन करण्यात येते की कोणीही अमली पदार्थाचे सेवन करू नये विक्री करून व जवळ बाळगू नये अन्यथा पोलिसातर्फे कठोर कारवाई करण्यात येईल. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दीपक मस्के, नायब तहसीलदार कारगुडे, कृषी सहायक सूर्यवंशी, ग्राम अधिकारी मुंडे, देवकते पोह जीवन मस्के, पोह वंजारे, पोह थिटे, पो ना जैस्वाल, चालक गजानन मुटकूळे, पो शि गजानन सरकटे, मापारी शंकर तिडके फोटोग्राफर व फोरेन्सिक टीम यांनी केली. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

# वीज कंत्राटदारांचे थकीत देयक अदा करण्यासाठी काम बंद आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

महावितरणच्या मनमानी कारभारा विरोधात आणि थकित बिलांच्या प्रश्नावरून हिंगोली जिल्हा इलेक्ट्रिकल कंत्राटदार असोसिएशनने आक्रमक पवित्रा घेतला आहे. १ मे पासून जिल्ह्यातील वीज देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे बंद करण्याचा इशारा कंत्राटदारांनी दिला असून प्रत्यक्षात कामबंद आंदोलन सुरू झाले आहे.

असोसिएशनने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार महावितरणकडून कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची बिले दीर्घ काळापासून थकवण्यात आली आहेत. वारंवार मागणी करूनही बिले मिळत नसल्याने कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शिवाय अधिकाऱ्यांकडून मनमानी कारभार केला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. बिले तात्काळ द्या आणि अन्यायकारक कारभार थांबवा अशी मागणी कंत्राटदारांनी केली आहे.

या आंदोलनामुळे १ मे पासून उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी तसेच वितरण ट्रान्सफॉर्मर संदर्भातील सर्व प्रतिबंधात्मक व ब्रेकडाऊन कामे पूर्णपणे बंद राहणार आहेत. याचा थेट परिणाम जिल्ह्यातील वीज पुरवठ्यावर होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात वाढलेला वीज वापर आणि वादळी पावसाच्या पार्श्वभूमीवर देखभाल कामे बंद राहिल्यास नागरिकांना वीज खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

हा लढा जनतेच्या सुरक्षेसाठीच असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहे. थकित बिले न मिळाल्याने दुरुस्ती साहित्य खरेदी करणे, कर्मचाऱ्यांचे वेतन देणे कठीण झाले आहे. त्यामुळे दर्जेदार काम करणे शक्य होत नाही. वीज व्यवस्था सुरळीत हवी असेल तर महावितरणने तातडीने थकित बिले अदा करावीत अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान महावितरणने यावर तातडीने तोडगा काढावा अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे. अन्यथा जिल्ह्यात वीज संकट गडद होण्याची भीती आहे.



**हिंगोली- तालुक्यातील सुखदेवानंद उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावी परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थाचालक उत्तमराव जगताप, दिलीप चव्हाण, प्रकाश निरगुडे, प्राचार्य वैद्य आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### तहसील सभागृहात व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा



हिंगोली- नशामुक्त भारत अभियान अंतर्गत येथील तहसील सभागृहात तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा दि. १ मे शुक्रवारी देण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रभारी तहसीलदार तथा नायब तहसीलदार डॉ. विनोद डोणगावकर, सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांच्या उपस्थितीत कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्ती संकल्प देण्यात आला. प्रारंभी तहसील परिसरात ध्वजारोहण पार पडले. राष्ट्रगीत, राज्यगीत समुह स्वरात पार पडले. तंबाखू नियंत्रण कायदा-२००३, तंबाखुमुक्त शाळा अभियान, महाराष्ट्र शासनाचे व्यसनमुक्ती धोरण-२०११ राबविण्यात येणार असल्याचे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा संघटक विशाल अग्रवाल यांनी सांगितले. या वेळी हुतात्म्यांचे स्मरण करून अभिवादन करण्यात आले. शासकीय कार्यालयातील कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, अभ्यागतांची उपस्थिती होती.

### कामगार दिनानिमित्त महिलांचा सत्कार



हिंगोली- आंतरराष्ट्रीय कामगार दिना निमित्त महिला कामगारांना वसमत येथे महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या वतीने दि. १ मे शुक्रवारी शुभेच्छा प्रदान करण्यात आल्या. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे महामंत्री विशाल अग्रवाल यांच्या हस्ते, महात्मा गांधीं यांचे रचनात्मक कार्यक्रम व्यसनमुक्तीचे पत्रक देऊन महिला कामगारांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या कार्यकर्त्या शुभदा सरोदे यांनी जागतिक कामगार दिनाचे महत्त्व विशद केले. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या, सर्वोदय मित्र मृण्मयी अग्रवाल यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रारंभी, शांततेचे उगमस्थान भगवान गौतम बुद्ध यांच्या पाषाण प्रतिमेस २५७० व्या जयंती निमित्त पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### ११२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११२ वाहन चालकांविरूध्द कारवाई करीत त्यांच्याकडून १ लाख २२ हजार ३०० रूपये दंड वसूल केला.

# जिल्हा परिषदेत अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबीर, २४८ जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**



शासकीय कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडताना अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. हीच बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या संकल्पनेतून आज येथील नक्षत्र सभागृहात जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' उपक्रमांतर्गत पुढाकार

जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या कार्यक्रमांतर्गत कर्मचाऱ्यांच्या स्वास्थ्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. शिबिराच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड होते. यावेळी त्यांनी व्यक्त केले की, प्रशासनाचे चाक गतिमान ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुदृढ असणे ही काळाची गरज आहे. कामाच्या व्यापात स्वतःसाठी वेळ काढणे कठीण होत असल्याने, एकाच छताखाली ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या शिबिराप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. गजानन चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, डॉ. प्रकाश जाधव यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. या शिबिरामध्ये डॉ. जहीरखान व शासकीय रुग्णालयातील टीम तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभदा तांबिले, डॉ. साक्षी मार्कड, डॉ. सयरा नजर आली, डॉ. सय्यद अकिब, औषध निर्माण अधिकारी शुभम पाटील, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गौतम खंदारे इम्रान सय्यद स्टाफ नर्स कलावती राठोड कल्पना कुठे इंदू बांगर यांच्या पथकाने रक्तदाब, मधुमेह, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण आणि हृदयविकाराशी संबंधित प्राथमिक तपासण्या केल्या.

# बारावी परिक्षेत सुखदेवानंद विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

जिजामाता बहुउद्देशीय सेवाभावी व शिक्षण संस्था हिंगोली द्वारा संचलित सुखदेवानंद उच्च माध्यमिक विद्यालय भांडेगाव येथील इयत्ता बारावी निकालाची परंपरा कायम राखली आहे. परीक्षेचा विज्ञान शाखेचा निकाल ९९.६०%, कला शाखेचा निकाल ९६.१५% असून एकूण निकाल ९८.७५% लागला आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांचे जिजामाता बहुउद्देशीय सेवाभावी व शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तानाजी मुटकुळे, संस्था सरचिटणीस ग्यानदेवराव जगताप, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपराव चव्हाण, संस्थेचे उपाध्यक्ष उत्तमराव जगताप, शाळा समितीचे अध्यक्ष तथा संचालक संतोषराव जगताप, संस्थेचे सहसरचिटणीस प्रकाश निरगुडे, प्राचार्य गजानन वैद्य, प्राचार्य बाबासाहेब इंगोले, मुख्याध्यापक वैजनाथ गाडे मुख्याध्यापक विशाल शिंदे, भाजपा महिला आघाडीच्या राजामती मुटकुळे, यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार केला, यावेळी संस्थेचे सरचिटणीस ग्यानदेवराव जगताप आणि संस्था कोषाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तर कार्यक्रमाचे संचलन सुभाष जगताप सर यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य बाबासाहेब इंगोले यांनी केले.

# शिवशंभोच्यावतीने पुरस्कार वितरण, गुणवंतांचा सत्कार, नागरी सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

शिवशंभो प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने शिवशंभो पुरस्कार वितरण, गुणवंतांचा सत्कार व खा. रामराव वडकुते यांचा नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला. या सोहळयात शिवशंभो प्रतिष्ठानचे बोधचिन्हांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी सभागृहात व परिसरामध्ये विविध क्षेत्रातील नागरिकांची मोठी गर्दी होती.



शुक्रवार दि. १ मे रोजी शिवशंभो प्रतिष्ठानच्या वतीने स्व.खा.शिवाजीराव देशमुख सभागृहात पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री नरहरी झिरवळ यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर मुख्य अतिथी म्हणुन सिंदखेडा राजा येथील राजमाता जिजाऊ यांच्या माहेरचे वशंज श्री.शिवाजी राजे जाधव व सत्कार मुर्ती खा.रामराव वडकुते यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख म्हणुन मंत्री दर्जा प्राप्त आ. हेमंत पाटील, आ.तान्हाजी मुटकुळे, आ.राजु नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजानन घुगे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष निहाल भैय्या, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा सराफ, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, राकाँ जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे, शरद पवार राकाँ जिल्हाध्यक्ष मुनीर पटेल, वकील संघाचे अध्यक्ष ॲड.शीधर घुगे, वंचित बहुजन आघाडीचे शिवाजी खरात, रिपाई गवई गटाचे जिल्हाध्यक्ष मधुकरराव मांजरमकर, रिपाई आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष दिवाकर माने, विशेष समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त गिता गुठ्ठे, रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष उज्वला तांभाळे, शिवसेना महिला आघाडीच्या रेखा देवकते, शशिकांत वडकुते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी हिंगोलीच्या विकासासाठी कटीबध्द असल्याचे सांगितले. यावेळी सत्कारमुर्ती खा.रामराव वडकुते यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. शिवशंभो प्रतिष्ठानच्या बोध चिन्हाचे लोकार्पण करण्यात आले. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ.सिंधुताई दहिफळे, प्रा.गजानन कुटे यांनी तर आभार प्रदर्शन शिवशंभो प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ॲड.रावण धाबे यांनी केले. सोहळा यशस्वीतेसाठी अध्यक्ष कल्याण देशमुख, उपाध्यक्ष ॲड. रावण धाबे, सचिव उमेश नागरे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर चव्हाण, सहसचिव गजानन मगर, सदस्य इंजि. अशोक अग्रवाल, डॉ.नामदेव कोरडे, प्रा.नंदकुमार संवडकर, प्राचार्य पवन सोळंके, सदाशिव सुर्यतळ, ॲड.संतोष राठोड, मनोज देशमुख, सुनिल पाठक, खान गजाला यास्मीन, सुधाकर वाढवे, संजय भुमरे, सौ.ज्योतीमाला धुळे, गोपाल सरनायक, गोपाल भोस, विजय गुंडेकर, प्रकाश इंगोले यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ऑपरेशन क्रकडाऊन; रसायन मिश्रित अवैध हातभट्टी, शिंदी व गुटखा माफियांवर कारवाई

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३ मे -**

शिवणी व शिवणी तांडा येथे रविवार, ०३ मे रोजी पहाटे नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन क्रकडाऊन अंतर्गत अवैध व्यवसायांवर मास रेड कारवाई करण्यात आली. या धडक मोहिमेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून अवैध हातभट्टी दारू, रसायन मिश्रित शिंदी आणि गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. या कार्यवाहीत तब्बल दहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

भल्या पहाटे सुरू झालेली ही कारवाई दुपारपर्यंत अखंड सुरू होती.अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या उपस्थितीत ही मोहीम राबवण्यात आली. या कारवाईसाठी तब्बल ८ पोलिस अधिकारी आणि १०० पेक्षा अधिक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

कारवाईदरम्यान पोलिसांनी हजारो लिटर रसायन मिश्रित अवैध हातभट्टी दारू व शिंदी जप्त करून तत्काळ नष्ट केली. तसेच हातभट्टी तयार करण्यासाठी साठवून ठेवलेले मोहफुलाचे शेकडो पोते जप्त करण्यात आले. हा साठा इतका मोठा होता की जवळपास दोन ट्रॅक्टरभर मोहफुले पोलिसांनी जप्त केली. यावरून या अवैध व्यवसायाचा मोठा विस्तार स्पष्ट झाला आहे.

याशिवाय रसायन मिश्रित शिंदी तयार करून विक्री करणाऱ्यांवर तसेच गुटखा विक्रेत्यांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला. एका गुटखा तस्करास पोलिसांनी



ताब्यात घेतले असून या प्रकरणात अंदाजे ३० ते ४० जणांवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या अचानक झालेल्या कारवाईमुळे शिवणी व तांडा परिसरात जिकडे पाहावे तिकडे पोलिसांचा मोठा बंदोबस्त दिसत होता. संपूर्ण परिसर पोलिस छावणीत रुपांतरित झाल्याचे चित्र होते. दरम्यान, शेकडो नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करून ही कारवाई पाहिली. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर एवढ्या मोठ्या प्रमाणात कारवाई प्रथमच होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

बातमी लिहेपर्यंत पोलिसांची कारवाई सुरूच होती. पुढील काळात अशा अवैध हातभट्टी दारू व शिंदी व्यवसायांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी अशाच धडक मोहिमा राबवण्यात येतील, असे पोलिसांकडून सांगण्यात आले. या कारवाईमुळे अवैध व्यवसायांवर मोठा आळा बसेल, असा विश्वास स्थानिकांनी व्यक्त केला आहे. तसेच अशा ठोस कारवायांमुळे पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

इस्लापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिवणी तांडा व परिसरात सुरू असलेल्या रसायन मिश्रित हातभट्टी दारू,शिंदी व गुटखा तस्करी विरोधात ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.अवैध व जीवघेणा व्यवसाय थांबवण्यासाठी पोलिस विभाग कटिबद्ध असून, अशा गैरकृत्यांवर पुढेही कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनीही अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी सांगितले.

सदरील कारवाई ही नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आगदी सूक्ष्म पद्धतीचे नियोजन लावून अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी करण्यात आली.या साठी इस्लापूर पोलिस ठाण्याचे सपोनी उमेश भोसले व त्यांची सर्व टीम होती तर हिमायातनगर येथील पोलिस निरीक्षक अमोल भगत,सापोनी वाठोरे,पोलिस उपनिरीक्षक शेख अजमोद्दीन,संजय कुमार पवार,भालेराव,जाधव,जगन्नाथ जाधव सतीश बनसोडे,भाऊसाहेब सोनकांबळे सह इस्लापूर,भोकर,हिमायतनगर,धर्माबाद,उमरी ,वजिराबाद,भाग्यनगर,शिवाजीनगर,इतवारा, नांदेड विमानतळ येथील पोलिस कर्मचारी व महिला पोलिस कर्मचारी हे कारवाई यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

**राज्य उत्पादन शुल्क विभागाला चपराक**

मागील अनेक वर्षापासून शिवणी इस्लापूर परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध रसायन मिश्रित हातभट्टी दारू आणि जीवघेणा ड्रग्स टाकून बनवलेलं रसायन युक्त शिंदी भर रस्त्यावर शाळा मंदिर व मुख्य गावात विक्री केले जाते.या कडे राज्य उत्पादन शुल्क जाणीव पूर्वक झोपेचा सोंग घेत आहे.खऱ्या अर्थाने ही कार्यवाही राज्य उत्पादन शुल्क विभागाने करावयास पाहिजे होती. पण ही पोलीस कार्यवाही खुद्द अपर पोलीस अधीक्षक यांनी केल्याने राजू उत्पादन शुल्क कार्यालय करते तरी काय ? हा प्रश्न या भागातील सर्वसामान्य नागरिकाला भेडसावने साहजिकच आहे? अप्पर पोलीस अधीक्षकांच्या कार्यवाहीमुळे जनतेस समाधान व्यक्त केले जाते पण राज्य उत्पादन शुल्क विभागासाठी ही एक मोठी चपराक म्हणावी लागते.

# जय श्रीराम च्या गजरात नरसीत रामनवमी उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ३ मे -**

मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्रीरामांच्या जन्मोत्सवानिमित्त नायगाव तालुक्यातील नरसी येथे दि. १ मे २०२६ रोजी रामनवमी अत्यंत उत्साह, भक्तीभाव आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. धर्म, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद लुटला.



गावातील श्री प्रभु राम मंदिर, जुनेगाव नरसी येथून दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. जय श्रीरामच्या घोषणांनी आणि भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या वातावरणात ही मिरवणूक मुख्य मार्गाने पुढे सरकत श्री भगवान बालाजी मंदिर व दत्त मंदिरापर्यंत काढण्यात आली. धर्म, संस्कृती आणि एकतेसाठी एकत्र येऊया, संघटित होऊया, हिंदू शक्ती वाढवूया हा संदेश देत शोभायात्रेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

यावर्षीच्या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले ते विविध देखावे आणि भव्य मूर्ती. प्रभु श्रीरामांची आकर्षक व भव्य मूर्ती, श्री बजरंगबलीचे देखणे रूप, नरसिंह अवताराचा जिवंत देखावा, नंदी-महादेवाचे प्रभावी सादरीकरण तसेच बाहुबली हनुमानाचा थरारक अवतार पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्रत्येक देखाव्याला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत जयघोषांनी वातावरण दुमदुमून गेले.

यावेळी भाजपाचे नेते श्रावण पाटील भिलवंडे, माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर, माजी जि.प. सदस्य माणिकराव लोहगावे, राष्ट्रवादीचे भास्कर भिलवंडे, शिवसेनेचे रविंद्र भिलवंडे, सरपंच गजानन भिलवंडे, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गंगाधर वडगावे, भास्कर कोकणे उपस्थित होते. या सोहळ्याचे आयोजन प्रभु श्री रामनवमी समितीचे प्रमुख सतीश गोड, राम खंनपटे, श्रीनिवास आक्कमवाड,पांडुरंग खंनपटे, अनिल सावकार श्रीरामवार, अंकुश खंनपटे, अध्यक्ष, किरण खनपटे, उपाध्यक्ष माधव वडगावे, सचिव,रघु कोकणे (गौरक्षक), सतीश गणगोपलवाड, सोमेश शेटकर, दीपक तळनीकर, बालू मानेमोड, प्रवीण पाळेकर,पुरी महाराज, बबलू भाऊ भरपूरे, शिव मठपती, शिव वाकरडे, नागेश मोरचोडे ,सुरज कोकणे, गोविंद मेटकर, आदर्श पोतदार, सह समस्त ग्रामस्थ, नरसी यांच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवक, महिला आणि ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

दरम्यान, मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बिलोली उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सपोनि राजू मुतेपोड, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे, कुंटूर पोलीस ठाण्याचे सपोनी विशाल भोसले, कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सपोनी ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे तसेच मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी तैनात होते. त्यांच्या दक्षतेमुळे मिरवणूक शांततेत व सुरळीत पार पडली.

## हुतात्मा जयंतराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम

**हिमायतनगर** -महाराष्ट्र स्टेटबोर्ड च्या वतीने घेण्यात आलेल्या एच.एच.सी. परीक्षेचा निकाल घवघवीत लागला असुन हिमायतनगर शहरातील हुतात्मा जयंतराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेचा एकूण निकाल ८६.३५% लागला असून कला शाखेचा निकाल ८०.९५% व विज्ञान शाखेचा निकाल ९५.२७% आहे. कला शाखेतील. प्रथम कु. शिवानी विश्वंभर राणे ८३.३३% द्वितीय क्रमांक कु. रूपाली बंडू जाधव ७९.३३% तृतीय क्रमांक कु. शिवानी संभाजी बेळगे ७७.५०% गुण घेऊन यश संपादन केला आहे तर विज्ञान शाखेतील प्रथम क्रमांक कु. हसीना खान शब्बीर खान ८३.५०% द्वितीय क्रमांक कु. इब्रा आझम सय्यद अजमन७०.६७% व तृतीय क्रमांक स्नेहा दत्तात्रेय चितालवाड ७०%० तर एकुण परीक्षार्थी पैकी विशेष प्राविण्यसह दाह विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन संस्थेच्या अध्यक्ष मा. सूर्यकांतबाई पाटील माजी केंद्रीय राज्यमंत्री व सर्व संचालक मंडळ तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक रणखाब सर, डाके सर, मोत्तेवार सर यासह सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले.

## हाणेगाव येथे हजरत मियां साहेब वली र.अ.यांचा उर्स उत्साहात साजरा

**हाणेगाव** -हाणेगाव येथील हिंदु-मुस्लीम एकतेचे प्रतीक असलेले संत हजरत मियां साहेब वली र. अ.यांचा वार्षीक उर्स शरीफ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गावातील आशुरखाना जामा मस्जीद



पासुन भव्य संदल मिरवणुक निघुन जुन्या बाजारपेठातुन मार्गक्रमण करत बसस्टॉप येथुन मार्गस्थ होत ढोल ताशांच्या गजरात आतीशबाजीसह संदल मिरवणुक दर्ग्यापर्यंत पोहचले यावेळी उर्स कमेटी व सर्वधर्मीय लोकांच्या उपस्थीत फुलांची चादर चढवत संदल चढवण्यात आले यावेळी हजारो भावीकांची उपस्थिती होती यानंतर प्रमुख पाहुणे युवा नेते प्रतीम देशमुख,हज्जु सेठ,खैराती मोलीसाब,सैय्यद ताहेर,मुनीरोदीन कोटग्याळे, मुक्तार पटेल ,आकाश देशमुख यांचा सत्कार करण्यात आला मग बहारदार कव्वालीचा जंगी मुकाबला झाला कव्वाल नासेर उस्मानी (बेंगलुर) शमा तब्बसुम (कोल्हापुर) यांनी उपस्थित भावीक भक्तांना कव्वालीतुन समता ,बंधुता ,एकता, देशप्रेम ,संतांच्या विचारांचे संदेश दिला .हा कार्यकम यशस्वी करण्यासाठी उर्स कमेटीचे खैराती सेठ,समीर पटेल,मंजुर मुल्ला,आमद आत्तार,छोटुभाई, ताहेर ईनामदार,हारुण कोटग्याळे,इसामु कोटग्याळे,इसाक चौधरी,युनुस आत्तार,ईर्षाद आत्तार,मोहदीन कोटग्याळे आदी जनांनी परीश्रम घेतले तर उर्स च्या ठिकाणी अणुचीत प्रकार घडु नये म्हणुन मरखेल ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नारायन यंगाले,लोखंडे,संदीप सर,बेलकर आदी कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## एमआरआय मशीनचे लोकार्पण

**नांदेड** -महाराष्ट्र दिनाचे औचित्यसाधून सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनातर्फे श्री गुरु गोबिंदसिंघजी स्मारक जिल्हा रग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने, पी.पी.पी. पद्धतीने कृष्णा डायग्नोस्टिक्स बाह्यस्त्रोत एजन्सीद्वारे नव्याने बसवण्यात आलेल्या अत्याधुनिक एमआरआय मशीनचा लोकार्पण सोहळा जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पार पडला.

I {MD.RAUFODDIN} S/o. {M.A.HAFIZ} Age {47} Years, Address: {AT POSTS:NATKAR GALLI,DEGLOOR TQ: DEGLOOR DIST.NANDED} has changed my Name from {MOHAMMAD RAUFODDIN } S/O {ABDUL HAFEEZ} to {MD.RAUFODDIN} S/O{M.A.HAFIZ} TO NEW NAME {MD.RAUFODDIN M.A.HAFIZ}

## इस्लापूरमध्ये भटक्या कुत्र्यांची भीषण अवस्था; प्रशासनाची डोळेझाक

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३ मे -**

इस्लापूर शहर व परिसरात भटक्या कुत्र्यांची अवस्था सध्या अत्यंत भयावह बनली असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे या प्राण्यांना अक्षरशः हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. शहरातील विविध भागांत भटक्या कुत्र्यांचे अंगावरील केस पूर्णपणे गळून पडलेले दिसत असून, त्यांच्या शरीरावर ठिकठिकाणी खोल जखमा, सूज, आणि संसर्गाचे स्पष्ट चिन्ह दिसून येत आहेत. काही कुत्रे इतक्या वाईट अवस्थेत आहेत की, त्यांना चालणे देखील कठीण झाले आहे.

या विदारक परिस्थितीकडे पाहता, इस्लापूरमध्ये भटक्या कुत्र्यांसाठी आवश्यक असलेली लसीकरण मोहीम पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. पशुवैद्यकीय विभाग आणि स्थानिक प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. अनेक वेळा तक्रारी देऊनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना प्रचंड वाढली आहे.

स्थानिकांच्या मते, मागील अनेक महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांवर ना नियमित उपचार होत आहेत, ना त्यांचे लसीकरण. परिणामी त्वचारोग, संसर्गजन्य आजार आणि उपासमारी यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. काही नागरिकांनी सांगितले की, आजारी कुत्रे रस्त्याच्या कडेला विव्हळत पडलेले दिसतात, मात्र त्यांना मदत करण्यासाठी कोणतीही अधिकृत यंत्रणा पुढे येताना दिसत नाही.

तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या त्वचारोगांमध्ये (विशेषतः संसर्गजन्य रोगांमध्ये) वेळीच उपचार न झाल्यास तो वेगाने पसरतो. इस्लापूरमध्ये सध्या अशीच परिस्थिती निर्माण झाली असून, एक कुत्रा आजारी पडला की त्याचा परिणाम संपूर्ण परिसरातील इतर कुत्र्यांवर होत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ काही प्राण्यांपुरता मर्यादित न राहता मोठ्या प्रमाणावर पसरत आहे.

या सर्व परिस्थितीचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही होत आहे. लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, महिला व वृद्ध नागरिक यांना रस्त्यावरून जाताना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या आक्रमक वर्तनामुळे लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. अशा स्थितीतही प्रशासन मात्र निष्क्रिय राहिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

इस्लापूर प्रशासनाच्या भूमिकेवर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. लसीकरण मोहीम का राबवली जात नाही?, पशुवैद्यकीय अधिकारी नेमके काय करत आहेत?, भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर ठोस उपाययोजना का होत नाही? असे सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. या प्रश्नांची उत्तरे देण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे दिसत आहे.

दरम्यान, इस्लापूर ग्रामपंचायत, इस्लापूर पशुवैद्यकीय विभाग यांनी तातडीने संयुक्त कारवाई करत विशेष मोहीम राबवणे अत्यावश्यक बनले आहे. भटक्या कुत्र्यांचे लसीकरण, उपचार, निर्बंधात्मक उपाययोजना (जसे की निर्बीजिकरण) आणि त्यांचे पुनर्वसन या बाबींवर त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा ही समस्या अधिकच विकोपाला जाऊन मोठ्या आरोग्य संकटाचे रूप धारण करू शकते.

नागरिकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, जर तात्काळ उपाययोजना करण्यात आली नाही, तर तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल. प्रशासनाने आता तरी जागे होऊन जबाबदारी स्वीकारावी आणि या गंभीर प्रश्नावर ठोस पावले उचलावीत, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.

# कायद्यानुसार कुर्बानी करणार, प्रशासनाने गो भक्तांवर अंकुश लावावा:कुल जमाते तहेरीक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ मे -**

येत्या दि.२७ मे रोजी बकरी ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त शासनाच्या गोवंश हत्याबंदी कायद्याचे तंतोतंत पालन करण्यात येणार असून, कायद्यानुसारच कुर्बानी देण्यात येणार आहे. परंतु प्रशासनाने गो भक्तांवर अंकुश लावावा, अशी मागणी कुल जमाते तहेरीकच्या वतीने पत्रकार परिषदेत करण्यात आली.

महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदी कायदा लागू आहे. या कायद्यानुसार गोवंशाची हत्या करण्यात येत नाही. परंतू बकरी, बकरा,मेंढी, म्हैस, हेला आदी प्राण्यांची कुर्बानी देता येते. त्यामुळे या कायद्याचे पालन करुनच कुर्बानी करण्यात येणार आहे. परंतू मागील काही वर्षांचा अनुभव पाहता ऐन बकरी ईदच्या वेळी काही गो भक्त विनाकारण बकऱ्यांची वाहतूक देखील अडवून मारहाण करतात. यावेळी गुन्हे दाखल देखील झालेले आहेत. अशा घटना घडू नये यासाठी पोलीस, प्रशासनाने खबरदारी घ्यावी. याबाबतीत प्रशासनाकडे निवेदन देखील देण्यात येणार असल्याचे कुल जमाते तहेरीकच्या वतीने पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. या पत्रकार परिषदेतस धर्मगुरु मुफ्ती आयुब कासमी, ॲड.अब्दुल रहेमान सिद्दीकी, एमआयएमचे सय्यद मोईन, फेरोज लाला, शेर अली, वसिम सुलेमान, माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला, बाबुभाई खोकेवाले, अजीत कुरेशी, ॲड.शाहेद खान आदींची उपस्थिती होती.

## चुडावा रेल्वे स्टेशन येथे भीमजयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**चुडावा, दि. ३ मे -**

चुडावा रेल्वे स्टेशन ता. पूर्णा येथे दि. ३० एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात पार पडली.

सकाळी ९ वा. उपा.उत्तम ढगे(सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी) यांच्या हस्ते पंचशील ध्वजरोहन पार पडले त्यानंतर संध्याकाळी डॉ.बाबासाहेबांच्या तैलचित्राची मिरवणूक काढण्यात आली, परिसरात कायदा व सुव्यवस्था आबाधित राहण्यासाठी चुडावा पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता, कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी आलेल्या सर्व नागरिकांना भोजनदान करण्यात आले भीमजयंती यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष बालाजी ढगे, उपाध्यक्ष पारेश कापुरे, राहुल गायकवाड,भगवान झिंझाडे आकाश लांडगे, राजू साठे, धम्मा खंदारे, चक्रपाणी माने, दिपक दाढे, ऍड. महेंद्र माने व इतर पदाधिकारी, महिलामंडळ व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.तसेच सूत्रसंचालन अनिल हाटकर यांनी केले.

## माजी सैनिक अरूण नारलावाड यांचा रूद्रापूरात भव्य नागरी सत्कार

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ३ मे -**

बिलोली तालुक्यातील ग्राम रूद्रापूर येथील माजी सैनिक अरूण नागोराव नारलावाड यांचा सैन्यदलात तब्बल १७ वर्ष प्रदीर्घ सेवा देत अखेर सेवानिवृत्त झाल्याने व नांदेड पोलीस दलात शिपाई म्हणून निवड झाल्याबद्दल मान्यवर, समस्त गावकऱ्यांकडून शनिवार दि.२ मे रोजी भव्यदिव्य नागरी सपत्नीक सत्कार करण्यात आला.

सर्वप्रथम नांदेडहून बिलोली शहरात सकाळी ११ वाजता दाखल होत छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करून रॅलीला सुरूवात करण्यात आली. भारत मातेचा जयघोष करीत रॅली कासराळी गावात दाखल झाली. त्यानंतर दुपारी १ वाजता रॅलीचे रूद्रापूर नगरीत वाजत गाजत आगमन झाले. मंचावर उपस्थित नांदेड जि.प.शिक्षण व बांधकाम माजी सभापती संजय अप्पा बेळगे, बिलोली कृ.उ.बाजार समिती सभापती रवी पाटील खतगांवकर, माजी सभापती शिवाजी पाटील पाचपिंपळीकर,जिल्हा प्रवक्ता काँग्रेस कमिटी दिलीप पाटील पांढरे,पं.स.बिलोली माजी उप सभापती शंकरराव यंकम,गावकरी व उपस्थित मान्यवरांकडून माजी सैनिक सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक, मान्यवर,सैनिक मनोगता नंतर वडील,बंधू अशोक नारलावाड व परिवार यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास हाणमंतराव पाटील बामणीकर,पांडुरंग रामपुरे पाटील,रमेश येशमवार, माजी सरपंच संजय नुकूलवार, माजी सैनिक साईनाथ जक्कावार, देगलूर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.शिवशंकर यंकम, अल्पसंख्याक सेलचे शेख माजीद कासराळीकर,माजी सरपंच सयाराम सिदाने,नागनाथ नियलवाड,प्रकाश मटके, रूद्रापूर सरपंच अर्जुन शेळके,उपसरपंच राजू गायकवाड,पोलीस पाटील बालाजी शेळके,नांदेड पोलीस संजय चरकुलवार,बाबूराव चरकुलवार, नरेंद्र शिरबतळ,नामदेव ईजुलकंठे, अशोक नारलावाड,नागोराव नारलावाड,आरूषी नारलावाड, श्रीदेवी नारलावाड,वनरक्षक सहदेव दोसलवार, संतोष सोमासे, रूद्रावार,बामणी माजी सरपंच सिद्धप्पा कन्ने,निवृत्त प्राध्यापक कन्हैयालाल सर,सहशिक्षक शिवदास मठपती,डोणगांव पोलीस पाटील हाणमंत कोंडामंगल आदी उपस्थित होते.

# मेहनत, मार्गदर्शन आणि यश; गोदावरी मनार कॉलेजची यशोगाथा सुरूच

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ३ मे -**

तालुक्यातील शंकरनगर येथील गोदावरी मनार पब्लिक स्कूल अंतर्गत चालणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या निवासी ज्युनिअर कॉलेजने यंदाही आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत बारावी विज्ञान शाखेत सलग अकराव्या वर्षी शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात संस्थेचे कौतुक होत असून विद्यार्थ्यांसाठी



मुकाडे कोमल ७८.३३ | धनवे उत्कर्षा ७४.५० | सिडाम संध्या ६९.५०

हा आदर्श ठरत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळावे या उदात्त ध्येयाने माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी या संस्थेची स्थापना केली. गेल्या तेवीस वर्षांपासून इयत्ता दहावीचा शंभर टक्के निकाल राखण्याची परंपरा जोपासत असताना, बारावी विज्ञान शाखेतही सातत्याने उत्कृष्ट निकाल देत संस्थेने नांदेड जिल्ह्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यंदाच्या बारावी परीक्षेत एकूण ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता आणि सर्व विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. तसेच विविध प्रकल्पांतर्गत परीक्षा देणाऱ्या ६७ विद्यार्थ्यांनीही शंभर टक्के यश मिळवत संस्थेचा लौकिक अधिक उंचावला.

यामध्ये कोमल भाऊराव मुकाडे हिने ७८.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. धनवे उत्कर्षा देविदास (७४.५०%) हिने द्वितीय तर सीडाम संध्या शामराव (६९.५०%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, सचिव डॉ. मीनलताई निरंजन पाटील खतगावकर तसेच प्राचार्य डी. पी. पांडेय यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

गोदावरी मनार पब्लिक स्कूल या संस्थेच्या सातत्यपूर्ण यशामागे येथील प्राचार्य डी पी पांडेय सर व त्यांच्या शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा विश्वास यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही योग्य संधी व मार्गदर्शन मिळाल्यास मोठे यश संपादन करू शकतात, याचा प्रत्यय या निकालातून पुन्हा एकदा आला आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातुरात भाज्यांचे दर कडाडले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल :** दिवसेंदिवस वाढणारा उष्मा आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे सध्या लातूरच्या भाजी मार्केटमध्ये भाज्यांचे दर चांगलेच कडाडल्याचे दिसून येत आहे. काकडी , हिरवी मिरची , टोमॅटोसह सर्व भाज्या सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर गेल्याचे पाहायला मिळत आहे.

भाजी मार्केटमध्ये परिस्थितीनुरूप बदल नेहमीच अनुभवायला येतो. टोमॅटोचा मौसम सुरु झाला की अक्षरशः पाच दहा रुपये किलोप्रमाणेही टोमॅटोला भाव मिळत नाही. तोच टोमॅटो उन्हाळ्यात अगदी शंभर दीडशे रुपये किलोपर्यंतही पोहोचल्याचे ग्राहकांनी पहिले आहे. लातूरच्या भाजी मार्केटमध्ये आजमितीस काकडी पन्नास ते साठ रुपये किलो, हिरवी मिरची तीस रुपये पाव किलो प्रमाणे विक्री होत आहे. मागणी कमी असल्याने सध्यस्थितीत वांग्याचा भाव मात्र दहा ते पंधरा रुपये पाव किलो असल्याचे दिसून आले. पालेभाज्यांची आवक कमी असल्याने पालेभाज्यांचे दरही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसत आहे. भाज्यांचे दर वाढल्याने गृहिणींचे किचनची बजेट बऱ्यापैकी बिघडल्याचे दृष्टीपथास येत आहे.



## लातुरातील वाहतूक कोंडीवर शोधला उपाय

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ मे : लातूर शहरातील वाहतूक कोंडी हा विषय अतिशय क्लिष्ट बनला होता. त्यावर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी रविवार दि. ३ मे पासून एक जाहीरनामा काढून वाहतुकी कोंडीवर तूर्तास योग्य पर्याय काढल्याचे दृष्टीपथास येत आहे. या पर्यायामुळे काही अंशी का होईना वाहतुकीच्या कोंडीवर मात करणे शक्य झाले आहे.

लातूर शहरातील जवळपास सर्वच रस्त्यावर वाहतुकीची मोठी कोंडी होत असल्याचे सगळ्यांनी अनुभवले आहे. लातुरातील वाहनधारक वाहतुकीचे नियम तोडण्याकामीही अव्वल असल्याचे सर्वज्ञात आहे. सकाळच्या तसेच सायंकाळच्या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यांसह छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी चौक, महात्मा बसवेश्र्वर चौक अशा प्रमुख चौकात चांगलीच वाहतुकीची कोंडी व्हायची. अक्षरशः एक वाहन जर लाईन सोडून मध्ये घुसले की तीनतीन - चारचार किलोमीटरपर्यंत वाहतुकीची कोंडी होत असे. त्यामुळे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी या वाहतूक कोंडीवर तात्पुरता उपाय शोधला असून त्यांच्या उपाय योजनेनुसार दि. ३ मे २०२६ पासून गांधी चौकाकडून शिवाजी चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर मोटारसायकल वगळता अन्य वाहनांना भुयारी मार्गालगतचा रस्ता शिवाजी चौक वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. गांधी चौकातून बार्शी रोडने शहराबाहेर जाणारी सर्व मोठी वाहने व एसटी बसेस मिनी मार्केट व अशोक हॉटेल येथून पॅरलल रोडने किंवा तहसील कार्यालयासमोरील उड्डाणपुलावरून औसा रोडकडे जातील. उड्डाणपूल संपल्यानंतर पूरणमल लाहोटी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरून यु टर्न घेऊन परत शिवाजी चौकात येऊन बार्शी रोडकडे जातील. गांधी चौकातून अंबाजोगाई रोडने शहराबाहेर जाणारी सर्व वाहने शिवाजी चौकात न जाता भुयारी मार्गाने बार्शी रोडकडे जातील व जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून यु टर्न घेऊन अंबाजोगाई रोडकडे जातील. पीव्हीआर चौकातून गंज गोलाईकडे येणारी सर्व वाहने शिवाजी चौकातील भुयारी मार्गाचा वापर करतील,असे पोलीस अधीक्षकांनी प्रसिद्धीस दिलेल्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे.

## आयएमए लातूरने दिली कष्टकऱ्यांना सावली, उन्हापासून संरक्षणासाठी विविध वस्तुंचे मोफत वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** कडाक्याच्या उन्हातही पोटासाठी राबणाऱ्या कष्टकऱ्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी महाराष्ट्र दिनी इंडीयन मेडीकल असोसिएशन लातूर शाखेच्या वतीने कष्टकऱ्यांना छत्र्या टोप्या, पाणी बॉटल्स, ओआरएस पाकीटे, छोटे पंखे, स्टॉल अंबरेलाज आदींचे मोफत वाटप करण्यात आले. आहे. यावेळी डॉक्टरांनी त्यांना उन्हापासून आरोग्याची काळजी कशी घ्यावी ? याबाबत माहिती सांगितली.याशिवाय शहर वाहतुक सुरळीत करण्यासाठी योगदान देणाऱ्या ट्रॅफिक पोलिसांनाही टोप्या, पाण्याच्या बॉटल्स देण्यात आल्या. त्या स्विकारताना कष्टकऱ्यांच्या चेहर्यावर कृतज्ञतेचा भाव दाटून आला होता.



गंजगोलाई येथे आयएमए लातुरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत , डॉ. शुभांगी राऊत, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. चेतन सारडा, डॉ. अब्दुल हमीद चौधरी, डॉ. संजय पाटील, डॉ. संजय वडार, डॉ. अनिल राठी, डॉ. स्नेहल देशमुख, डॉ. मेघा गुगले यांनी वस्तुंचे वाटप केले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ. आकांक्षा अवस्थी व डॉ. वेदांत ,डॉ. अभय कदम, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. विश्र्वास कुलकर्णी, डॉ. वैशाली दाताळ, डॉ. राजकुमार दाताळ, डॉ. सुभाष गोरे, डॉ. राखी सारडा, डॉ. अमित उटीकर, डॉ. राजेश शाह, डॉ. सुमीत वाघमारे, डॉ. राजश्री सावंत, डॉ. दीपक गुगळे राजीव गांधी चौक येथे डॉ. इंदिरा पाटील, डॉ. सुमित पाटील ,डॉ. किरण डावळे, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. सूर्यकांत निसाळे, डॉ. अजय जाधव, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. आनंद कलमे, डॉ. रचना जाजू, डॉ. शैला सोमाणी, डॉ. शिरीष पाटील, डॉ. अयाज शेख, डॉ. स्नेहल देशमुख, मेघा कोटलवार, चंद्रज्योती बांदखडके यांनी रेणापूर नाका येथे आयएमए लातूरचे सचिव डॉ. विश्रांत भारती व डॉ. मन्सूर भोसगे, , डॉ. रवींद्र इरपतगिरे, डॉ. संदीप कवठाळे, डॉ. राजेश एनाडले, डॉ. अनघा राजपूत, डॉ. अशोक अरडवाड, डॉ. आरती झंवर, डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. चाँद पटेल, डॉ. धनंजय पडवळ, डॉ. विमल डोळे, डॉ. प्रशांत कापसे यांनी तर कणेरी चौक येथे महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर पवार, गणेश पवार, डॉ. महादेव बन्सोडे, डॉ. गिरीश कोरे, डॉ. किरण गोजमगुंडे, डॉ. संतोष डोपे, डॉ. सुरेखा काळे, डॉ. उमेश कानडे, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. सुरेखा निलंगेकर, डॉ. विकास साळुंके, डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. राहुल सुळ, डॉ. दीपक दाडगे, डॉ. हनुमंत किनीकर यांनी कष्टकर्यांना वस्तुंचे वाटप केले.

## केंब्रिज महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत उज्वल यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे बोर्डाकडून इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवार, दिनांक २ मे २०२६ रोजी दुपारी १२ वा. ऑनलाईन जाहीर करण्यात आला. सदरील निकालामध्ये अमरदीप बहुउद्देशीय सेवाभावी संस्था लातूर द्वारा संचलित केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाच्या २२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.





सदरील निकालामध्ये हासबे आदित्य दयानंद या विद्यार्थ्याने ८३.६१% गुण घेऊन कॉलेजमधून सर्वप्रथम, अभय सतीश मारकोळे ८३.३३% गुण घेऊन सर्व द्वितीय तर यरमे निखिल सतीश या विद्यार्थ्याने ८१.५०% गुण घेऊन तृतीय आला आहे.

तसेच कवडे प्रद्युम्न ८१.१७%, जाधव आदित्य ८१.१७%, सांजेकर हर्षल ८०.५०%, हारडे वैष्णवी ७७.६७%, दूधभाते आदिती ७७.६७%, अजमेरा श्रीनिवास ७७.१७%, पाठक श्रुती ७७%, भुतेवाढ श्रीसंत ७६.८३% गुण घेवून उत्तीर्ण झाले. सदरील निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे यावर्षी बारावी बोर्ड परीक्षा इन कॅमेरा घेण्यात आलेल्या होत्या तरीसुद्धा विद्यार्थ्यांच्या आर्थक परिश्रमातून सदरील यश संपादन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयामध्ये एकूण ७५ विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षा दिली होती. त्यापैकी २२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर ४५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयाच्या या उज्वल यशाबद्दल प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन संस्थेचे संस्थापक सचिव प्रा. सतीश मारकोळे पाटील, उपाध्यक्ष भारत बुक्तर, फिनिक्स प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या अंजना गुजराती, वीर बाजीप्रभू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मारुती बिरादार, प्रा.शैलजा नीटुरे, प्रा.शितल नल्ले देशमुख, प्रा.सरिता चौधरी, प्रा. भागवत धुळगंडे, प्रा. भारत आघाव, प्रा. संजय पाटील, प्रा. साळुंके, केंब्रिज कॉलेजच्या क्लार्क अर्चना गायकवाड व अनिता स्वामी यांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## नियमित पाणीपुरवठ्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर **दि. ३ मे** : आता उन्हाळा चांगलाच कडक जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. अशावेळी शहराच्या सर्वच भागात नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा,अशी मागणी वाढीस लागली आहे.

लातूरकरांना आठवड्यातून केवळ एकदाच पाणीपुरवठा केला जातो. धरणात मुबलक पाणीसाठा असतानाही कधीच नियमित पाणीपुरवठा झालेला नाही. याला नियोजनाचा अभाव हे मूळ कारण आहे. दरवर्षी उन्हाळ्यात शहरातील पाणीटंचाईच्या झळा चांगल्याच जाणवतात. त्यामुळे मनपा प्रशासनाने नियमित पाणीपुरवठा करावा अशी मागणी होत आहे.

## अभिनेते रितेश देशमुख यांच्या अभिवादन रॅलीला मोठा प्रतिसाद





**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** लातूर : 'राजा शिवाजी' चित्रपटाचे निमति, लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते रितेश विलासराव देशमुख यांनी दि. २ मे रोजी सायंकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौका ते पीव्हीआर चौकापर्यंत दुचाकी रॅली काढण्यात आली. यादरम्यान जागोजागी रितेशदादांचे लातूरकरांनी स्वागत करुन प्रचंड प्रतिसाद दिला. अभिनेते रितेश देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या अभिवादन केले. त्यावेळी 'जय जय जय जय जय भवानी जय शिवाजी', 'तुमचं आमचं नातं काय, जय भवानी, जय शिवराय', 'जय जिजाऊ, जय शिवराय', 'हर हर महादेव...', अशा घोषणांनी सा रा आसमंत दुमदुमून गेला. त्यानंतर रितेशदादांनी सर्वांचे आभार माणुन दुचाकी रॅलीला प्रारंभ झाला. दयानंद गेट, संविधान चौक, रिलायन्स पेट्रोल पंप, एमआयडीसी कॉर्नर आणि पीव्हीआर चौकात रितेशदादांचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले. यावेळी तरुणांमध्ये प्रचंड उत्साह होता,

## सातकर्णी महाविहारात १० फूट बुध्द मूर्तीची स्थापना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** तालुक्यातील रामेगाव शिवारातील सातकर्णी नगर येथील धम्म संस्कार केंद्रातील महाविहारात वैशाख पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी दहा फूट उंच बुध्दमूर्तीचे अनावरण करण्यात आले. यानिमित्त शुक्रवारी (दि.१) सकाळच्या सुमारास लातूर येथील डॉ. आंबेडकर चौकात धम्म ध्वजारोहण करण्यात आले. बुध्दमूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. उपगुप्त महाथेरो होते. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे, महापौर जयश्री सोनकांबळे, अभिनेत्री प्रियंका उबाळे, प्रा. रामेश्र्वर बद्दर, डॉ. सुधाकर गुळवे, ॲड. मल्लिकार्जुन करडखेलकर, भालचंद्र सोनकांबळे उपस्थित होते.

तथागत गौतम बुध्द हे भारताचे सर्वोत्तम भूमीपुत्र आहेत. त्यांच्या मानवतेची शिकवण अतुलनीय आहे. मानवता, करुणा, शांती आणि बंधुभाव ही तत्वे लोक कल्याणाची आहेत. प्रत्येकाने त्यांच्या नैतिक शिकवणीचे आचरण करावे, ही बुध्द मूर्ती करुणा, शांती, मैत्रीची प्रेरणा देत राहील, असे मार्गदर्शन भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले.

## पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** महाराष्ट्र दिन तसेच महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन, लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशन,आयएमए लातूर व पोद्दार ॲक्सिडेंट ॲंड ट्रॉमा केअर सेंटरच्या संयुक्त विद्यमाने येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांसाठी खोरी गल्ली परिसरातील विरंगुळा केंद्रात कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते.





पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित शिबिराचे उदघाटन पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती , लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष डॉ. गिरीश कोरे, सचिव डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. चेतन सारडा, डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. इम्रान कुरेशी, श्याम धूत, प्रसाद उदगीरकर, पस्तापुरे , विजय रांदड, जितू बजाज, रामेश्र्वर सोमाणी, संजीव भार्गव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पोद्दार हॉस्पिटल आणि मोफत अस्थिरोग शिबीर हे जणू आता लातूरकरांसाठी एक अद्वितीय समिकरणच बनले आहे. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले आजचे हे १७४ वे मोफत शिबीर होते. आपण समाजाचेही काही देणे लागतो. ते अशा शिबिराच्या माध्यमातून केलेल्या रुग्णसेवेने साध्य होते, या विचाराने डॉ.अशोक पोद्दार मोफत रुग्णसेवेचा हा यज्ञ चालविण्याचे काम करत असतात.

यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. पाच सहा दिवस चालणाऱ्या या शिबिराच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. जास्तीत जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.

राहुलकुमार मीना यांनी आपल्या मनोगतात रुग्णांनी या उपक्रमांचा लाभ घेऊन आपले आयुष्य निरोगी जगण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. पोद्दार हॉस्पिटलच्या मोफत अस्थिरोग शिबिराबाबतची ख्याती आपण ऐकून असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. अशोक पोद्दार यांनी आपल्या प्रास्ताविकात हा उपक्रम मागच्या नऊ वर्षांपासून राबविला जात असल्याचे सांगितले. सहा वर्ष बेस्ट उपक्रमाच्या आयोजनाचे पारितोषिकही मिळाल्याचे सांगितले. राज्यातील ३० हुन अधिक जिल्ह्यात अशा प्रकारचे उपक्रम डॉ. पराग संचेती यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात येतात. आपल्या या कार्याची दखल ऑल इंडिया ऑर्थोपेडिक असो.च्या वार्षिक सोहळ्यातही घेतली गेली असून त्याचाही पुरस्कार मिळाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोद्दार हॉस्पिटलच्या या मोफत अस्थिरोग शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये ५७ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली.यावेळी २८ रुग्णांचे एक्सरे, १८ रुग्णांची रक्त तपासणी तर ३२ रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. सर्व रुग्णांना मोफत औषधींचेही वितरण करण्यात आले. डॉ.अशोक पोद्दार, डॉ. इम्रान कुरेशी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. कपिल धुमुरे, डॉ. सिद्रामप्पा भोसगे ,डॉ. प्रशांत अंभोरे यांनी रूग्णांची तपासणी केली.

## श्री राम कथा ज्ञानयज्ञाच्या भव्य मंडपाचे आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** औसा तालुक्यातील किल्लारी येथे दि. २३ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या प.पू. राष्ट्रसंत मोरारी बापू यांच्या श्री राम कथा ज्ञान यज्ञाच्या भव्य मंडपाचे श्री निळकंठेश्र्वर सहकारी साखर कारखाना परिसरात भूमिपूजन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. ही कथा दररोज सकाळी साडेनऊ ते दुपारी दिड या वेळेत होणार आहे. कथेसाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी दररोज महाप्रसादाचीही सोय करण्यात आली आहे.



आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते सभा मंडपाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी लक्ष्मीरमणजी लाहोटी, ओमप्रकाश डागा , बियाणी, किल्लारीच्या सरपंच सुलक्षणा बाबळसुरे, माजी सरपंच डॉ. शंकर परसाळगे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. भूमिपूजन सोहळ्यानंतर श्री राम कथा संयोजन समितीच्या वतीने आ. पवार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना आ. अभिमन्यू पवार यांनी श्री राम कथेच्या श्रवणासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास आपण सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. श्री राम कथेच्या श्रवणासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे. त्याकरिता आवश्यक तो पोलीस बंदोबस्त, आरोग्य सुविधाही उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याची माहिती आ. पवार यांनी दिली. माहेश्र्वरी समाजाच्या लातूर शहराध्यक्षपदी लक्ष्मीकांत सोनी यांची निवड झाल्याबद्दल यावेळी आ. पवार आणि डागा परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ईश्र्वरप्रसाद डागा यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कथेच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी विस्तृतपणे विशद केली. याप्रसंगी हुकूमचंदजी कलंत्री, राजेंद्र मालपाणी, दिनेश पपरूनिया, श्याम खटोड, शरद नावंदर, रमेश राठी, रामेश्र्वर सोमाणी, ईश्र्वर बाहेती, गोविंद धूत, श्याम धूत, विजय पस्तापुरे , हरीशभाई ठक्कर, रामबिलास लोया, हरिकिशन मालू, आनंद लाहोटी, बाळूसेठ बिदादा, दर्शन डागा , आकाश डागा, किरण झंवर, श्रीकांत बजाज, श्याम बांगड यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## केवायसीअभावी किती बहिणी नाराज हे लवकरच कळणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** केवायसी न झालेल्या लाडक्या बहिणींना महिन्याला मिळणारे पंधराशे रूपये बंद होणार आहेत. हा आकडा येत्या दोन, तीन दिवसांत समोर येईल. लातूर जिल्ह्यातील ६१ हजार लाडक्या बहिणी केवायसीसाठी पात्र असल्याचे महिला व बाल कल्याण विभागाने जाहीर केले होते.

दरम्यान, मुदतीत अनेक लाडक्या बहिणींची केवायसी न झाल्याने ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली होती. या मुदतीतही केवायसी न झालेल्या लाडक्या बहिणी महिन्याला मिळणाऱ्या पंधराशे रूपयांच्या मानधनापासून वंचित राहतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्र दिनी पोलिसांच्या शिबिरात ७२९ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** महाराष्ट्रदिन व कामगारदिनानिमित्त शुक्रवारी (दि.१) जिल्हा पोलीस, डॉ. भालचंद्र रक्तपेढी व रोटरी क्लब लातूर मिडटाऊनच्या संयुक्त विद्यमाने शहरातील पोलीस अधीक्षक कार्यालयासह पाच पोलीस ठाण्यांमध्ये आयोजित शिबिरात तब्बल ७२९ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यावेळी सहभागी रक्तदात्यांसह नागरिकांना एक हजार हेल्मेटचे वितरण करण्यात आले. ऐन लग्नसराईच्या काळात होणाऱ्या अपघातांमुळे जाणवणाऱ्या रक्ताच्या तुटवड्यावर या शिबिरामुळे रुग्णांना रक्त उपलब्ध होणार आहे.



पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी तांबे यांनी स्वतः रक्तदान करून पोलीस अधिकारी, अंमलदार व नागरिकांना रक्तदान करण्यास प्रोत्साहित केले. यावेळी आयोजित शिबिरांमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयातील शिबिरात १६५ जणांनी रक्तदान केले. गांधी चौक पोलीस ठाण्यात १७७, एमआयडीसी पोलीस ठाण्यात १३८, विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात १३२ व लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यातील शिबिरात ११७ अशा एकूण ७२९ जणांनी रेकॉर्डब्रेक रक्तदान केले.

लातूर जिल्हा पोलीस दलाने केवळ कायदा-सुव्यवस्था राखण्यापुरते कार्य न करता सामाजिक जाणीव, मानवी मूल्ये आणि जनहित यांचा संगम घडवून आणत एक आदर्श निर्माण केला आहे. या उपक्रमामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्र्वास अधिक दृढ झाला आहे. या शिबिरांच्य यशस्वीतेसाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे, गांधी चौकचे सुनील रेजितवाड, शिवाजीनगरचे अभिषेक शिंदे, विवेकानंद चौकचे संतोष पाटील, लातून ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहायक पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी वैभव नेटके, यांन विशेष परिश्रम घेतले.